दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३७ | शनिवार दि.१८ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

धोरणांच्या कसोटीत भारत यशस्वी व्हावा !

मागच्या अनेक वर्षांपासून आपण ज्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्रयत्नरत होतो तो चाबहार बंदर विकास प्रकल्पाचा करार नुकताच भारत व इराणमध्ये झाला आहे. चाबहार बंदर विकास हा भारताच्या व्यापारवाढीसाठीच नव्हे तर भू–सामरिक आणि आर्थिक धोरणासाठीही महत्त्वाचा प्रकल्प आहे.

दहावी, बारावीचा निकाल पुढील आठवड्यात

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात बारावी आणि दहावीच्या परीक्षा झाल्या होत्या. सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार आहे. बारावीचा निकाल येत्या आठवड्यात जाहीर होईल अशी माहिती आहे. तर दहावीचा निकाल मे महिन्याच्या शेवटी जाहीर होऊ शकतो.

तीव्र चक्रीवादळ धडकणार, महाराष्ट्रासह तीन राज्यांना इशारा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असताना, आता २३ ते २७ मे दरम्यान देशातील काही राज्यांमध्ये एक चक्रीवादळ धडकण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रामुख्याने बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन, त्याचे रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा सर्वाधिक प्रभाव ओडिशा, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये दिसून येणार आहे. हे चक्रीवादळ पश्चिमेकडे सरकण्यापूर्वी पूर्वेकडील किनारपट्टीवर धडकेल, ज्यामुळे देशाच्या विस्तृत भागावर त्याचा परिणाम होईल. असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून (आयएमडी) व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या तुफान अवकाळी पाऊस पडत ◀◀ पान २ वर

महाराष्ट्रात २० मेपर्यंत अवकाळी पावसाचे धूमशान!

» पुढील तीन दिवसांसाठी यलो अलर्ट

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोपडले आहे. काही ठिकाणी उकाड्यापासून दिलासा मिळाला असला, तरी अनेक ठिकाणी शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २० मेपर्यंत अवकाळी पावसाचे संकट कायम आहे.

राज्यात विविध भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काही भागात उष्णतेच्या लाटेला इशाराही

देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, रायगड, रत्नागिरीमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. याशिवाय सिंधुदुर्गात जोरदार पावसाची शक्यता असून जिल्ह्याला अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, जळगाव, नाशिकमध्येही अवकाळी ◀◀ पान २ वर

या जिल्ह्यांना यलो अलर्ट

जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. या भागात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. प्रशासनाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहनही केले आहे.

आता तरी कटुता संपवा; सामाजिक सलोखा जपा!

अजूनही वेळ गेली नाही, सोशल मिडीयापासून दूर रहा

बीड । प्रतिनिधी

रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीचं नातं घट्ट असते, असे म्हणतात. मग ही मैत्री जातपात आणि धर्म पाहत नसते. पण आपण आताच नेमकं निवडणुकीच्या काळातच जात, धर्म याची चर्चा कशासाठी करीत आहोत, हे प्रत्येकाने आपल्या हृदयावर हात ठेवून स्वत:ला विचारा, त्याचे तुम्हाला निश्चितच उत्तर मिळेल. लोकसभा निवडणुकीत जे काही समाजासमाजात विष पेरले गेले आहे, त्याचा उपचार आता खऱ्या अर्थाने आपल्यालाच करावा लागणार आहे. सोशल मिडीयाचा वापर करा पण चांगल्यासाठी, समाजासमाजात तेढ निर्माण करण्यासाठी नाही, त्यामुळे आजपासून प्रत्येकाने जबाबदारीने वागण्याची शपथ घेण्याची खरी गरज असल्याचे म्हटले जात आहे.

बीड जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणूक पार पडली. राजकारण हे निवडणुकीपुरता असते असे वारंवार म्हटले जाते. मतदान करण्याचा वेळ संपल्यावर सर्वच विरोधक एकाच हॉटेलवर बसून चहा पितात आणि गप्पा मारत गप्पा मारत आपापल्या घरी निघून जातात. मतदान संपले आता आपापले पाहू, शेतीचे कामे कशी करायची हे पाहू, मुलीच्या लग्नाचे पाहू, गावचा विकास कसा करायचा याचा विचार करू, अशा स्वरूपात चर्चा होते आणि खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या काळात होत असलेल्या ◀◀ पान २ वर

सामाजिक एकोपा बिघडवता कामा नये–नंदकुमार ठाकुर

चुकीच्या पोस्टमुळे नांदुरघाटमध्ये दोन गटात वाद झाला होता. आतापर्यंत २०० जणांवर गुन्हा दाखल केला असून ५ जणांना अटक केली आहे. दोन्ही समाजात आता चांगले वातावरण निर्माण होत आहे. कुठल्याही गोष्टीमुळे आपल्यातील सामाजिक एकोपा बिघडवू नये याची काळजी सर्वांनी घ्यावी, असे आवाहन पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांनी केले. तसेच सायबर सेल सोशल मिडीयावर करडी नजर ठेवून असून दररोज २० ते २५ लोकांना फोन करुन त्यांच्याशी बोलून पोस्ट डिलीट करायला लावण्याचे काम केले जात आहे. तसेच प्रत्येक गाव, शहरात शांतता कमिटीच्या बैठका घेण्याच्या सुचना पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या आहे. जेष्ट नागरीक, पत्रकार यांनी पुढाकार घेऊन तरुणांमध्ये जनजागृती करण्याचे काम करण्याची गरज असल्याचे सांगितले.

आता चुकीची पोस्ट टाकाल तर कारवाई

» **पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांनी नांदुरघाट येथील घटनेच्या पार्श्वभुमिवर सोशल मिडीया वापरणाऱ्या तरुणांना कडक शब्दात इशारा दिला आहे. कोणीही चुकीची व भावना दुखवणारी पोस्ट टाकली तर सायबर सेल लक्ष ठेवून आहे. अशा व्यक्तीवर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. त्यामुळे अशा काही चुकीच्या गोष्टी आपल्या हातून होणार नाहीत, याची सर्वांनी काळजी घेण्याची गरज आहे.**

अफवांना बळी पडू नका–परमेश्वर सातपुते

» **ज्यांच्या सोबत आपण लहानाचे मोठे झालो, शाळेत सोबत गेलो, एकमेकांच्या सुखदुखात सहभागी झालोत, त्यावेळी कोणीही जातपात पाहिली नाही. वर्षानुवर्षांचे हितसंबंध आणि जिव्हाळा आता जपण्याची गरज आहे. त्यामुळे आता सर्वांनी सामाजिक सलोखा जपला पाहिजे. निवडणुक झाल्यावर हे सर्व सोडून द्यायला हवे. एकमेकांच्या मदतीशिवाय समाजात कोणीही सुखी राहू शकत नाही, त्यामुळे अफवांना बळी पडू नका, असे आवाहन उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.**

लोकशाहीच्या देशात विविध निवडणूका येत आसतात जात आसतात.निवडणूका ह्या पक्षाच्या विचारसरणीवर व जाहीरनाम्यातील विषयांवर लढाल्या पाहीजेत. सध्या बीड लोकसभा निवडणूकीत निर्माण झालेले सामाजिक वातावरण पाहून मन व्यतीत होत आहे. तरी सामाजिक सलोखा राखण्यासाठी सर्वांनी संयम राखून सामाजिक सलोखा कायम ठेवावा.

–प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे
राज्य प्रमुख सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार

तरुणांच्या हाती देशाचे भविष्य, जातीधर्मात अडकू नका–ॲड. सर्जेराव तांदळे

तरुणांच्या हातात भविष्यातील देश आहे, त्यांनी अशी भुमिका घेतली तर देश कोण सांभाळणार आहे. देशाला धर्मनिरपेक्ष तरुणांची आज गरज असून तरुणांनी जातीपातीच्या बंधनात अडकून न राहता सर्व जाती–धर्मांच्या लोकांना सोबत घेऊन काम केले पाहिजे, जातीचे समाजकारण आणि राजकारण करणाऱ्यांचा इतिहास यापुर्वी आणि पुढेही लिहिला जाणार नाही. त्यामुळे तरुणांनी सोशल मिडीयावर पोस्ट टाकताना त्या पोस्टचा काय परिणाम होऊ शकतो, याचा अगोदर विचार करावा, असे आवाहन भाजप प्रदेश कार्यकारिणी समितीचे सदस्य तथा जिल्हा सरचिटणीस ॲड. सर्जेराव तांदळे यांनी केले आहे.

सामाजिक सलोखा जपण्याचे काम करा–राऊत

» **बीड जिल्हा हा संत परंपरा आणि वारकरी सांप्रदायाला मानणारा आहे, जिल्ह्याची प्रतिमा राज्यात चांगली राहावी यासाठी सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे. आज सामाजिक सलोखा जपण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक असून सोशल मिडीयाचा चांगल्यासाठी वापर करा, चुकीची पोस्ट टाकू नका, असे अवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष सुभाष राऊत यांनी केले आहे.**

'पुतिन प्रमानेच मोदींचा प्रयत्न'

मुंबई: दिल्लीमध्ये मी सर्वांना मोफत वीज देतो. त्यामुळे ते मला तुरुंगात टाकू पाहात आहेत. तुम्ही मोठे नेते आहात. संपूर्ण देशात वीज मोफत करुन दाखवा. रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी सर्व विरोधकांना संपवले आहे. बांगलादेशमध्ये सर्व विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले आहे. पाकिस्तानमध्ये देखील अनेकांना तुरुंगात टाकण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी यांना भारतात देखील हेच करायचे आहे, असे केजरीवाल म्हणाले.

भिवंडी येथे इंडिया आघाडीची सभा शुक्रवारी घेण्यात आली. सभेसाठी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, शरद पवार, उद्धव ठाकरे, संजय राऊत, नाना पटोले आदी नेते उपस्थित होते. यावेळी सभेत बोलताना अरविंद केजरीवाल यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली. केजरीवाल म्हणाले, एकवेळ अशी होती पाकिस्तान, बांगलादेश आपल्याकडून शिकत होते. आज मोदी त्यांच्याकडून शिकत आहेत. काँग्रेसचे बँक खाते फ्रिज केले. शिवसेनेचे दोन तुकडे केले. ममतांच्या किती मंत्र्यांना अटक केली? मोदी कायर आहेत. बहादूर ◀◀ पान २ वर

सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने उपाय योजना करावी-जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई पाहता टँकर प्रणाली मध्ये तात्काळ सुधारणा करून पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी व सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

बीड जिल्ह्यात सध्या तीव्र पाणी टंचाई सुरु असून शासना मार्फत टंचाई ग्रस्त गावांना टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून मंजूर टँकरची संख्या व टँकर द्वारे करण्यात येणार्या खेपा यात मोठ्या प्रमाणात तफावत आहे. टँकर मंजूर असलेली संख्या व मंजूर खेपा गाव निहाय टाकण्यात येत नाहीत. जी.पी.एस. प्रणाली टँकरला बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे टँकरचे लोकेशन मिळत नाही. ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ५८.५० क्विंटल			
	२,२७१	२,८७१	२,४९५
ज्वारी/हायब्रिड : ९५.०० क्विंटल			
	१,८९१	२,८९०	२,४०६
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : २३.५० क्विंटल			
	६,०००	११,६२१	१०,४२४
उडीद : ५.५० क्विंटल			
	७,९००	७,९०१	७,९००
बाजरी: १०.५० क्विंटल			
	२,२००	३,०११	२,४३२
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: ३७.५० क्विंटल			
	४,४००	४,५४५	४,४९७
हरभरा: २०.५० क्विंटल			
	५,८००	५,९०१	५,८६०

बस–मोटारसायकलची धडक; युवकाचा दुर्दैवी अंत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माहेरी गेलेल्या बायकोला परत घरी आणावयास गेलेल्या अजीम शेख या युवकाचा बस व मोटार सायकलच्या समोरासमोर धडकेत जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अंबाजोगाई येथील सदर बाजार परिसरात सध्या चनई येथे वास्तव्यास असलेला तसेच शहरातील मिलिया शाळेतील स्कुल बसचा चालक अजीम हज्रू शेख हा युवक पाटोदा येथे माहेरी गेलेल्या पत्नीस आणावयास जात होता. मात्र पाटोदा येथे पोचण्यापूर्वीच गावच्या पंधरा किलोमीटर अलीकडेच भिवंडी अहमदपूर (–१३ ७८९६) गाडीची समोरासमोर धडक होऊन त्या युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेने पाटोदा तसेच अंबाजोगाई शहर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्याच्या पश्चात आई, वडील ,पत्नी व मुलगा असा परिवार आहे. ◀◀ पान २ वर

अवकाळीचा तडाखा; वीज पडून पशुधनाचा मृत्यू

परळी । प्रतिनिधी

परळी शहर व तालुक्यात अवकाळी पावसाचा कहर पहावयास मिळाला. सोसाट्याच्या वाऱ्यासह विजेच्या कडकडाट अवकाळी बरसला.गुरुवार दि १६ रोजी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस आणि विजेच्या कडाक्याने तालुक्यातील पोहणेर आणि डाबी शिवारात वीज पडून बैल ◀◀ पान २ वर

काँग्रेसने जनतेची नव्हे, चेल्या चपाट्यांची गरिबी हटवली–गडकरी

धुळे । प्रतिनिधी

भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूनपासून इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी भारतात गरिबी हटावचा नारा दिला. या अंतर्गत वीस

कलमी, पाच कलमी कार्यक्रम येऊन बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. मात्र जनतेची गरीबी हटली नाही. पण काँग्रेसच्या माध्यमातून अभियांत्रिकी, वैद्यकीय ◀◀ पान २ वर

मोदींच्या सभेत घोषणाबाजी करणाऱ्या तरुणाने घेतली शरद पवारांची भेट

नाशिक। प्रतिनिधी

येथील पिंपळगाव बसवंत येथे झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेत कांदा प्रश्नावर बोलणारा जर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा असेल, तर मला त्याचा अभिमान आहे, असे कौतुक मोदींच्या सभेत घोषणाबाजी करणाऱ्या किरण सानपबद्दल जाहीररीत्या शरद पवारांनी काढल्यानंतर या तरुणाने नाशिकमध्ये शरद पवारांची भेट घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी नाशिकमध्ये घेतलेल्या सभेत कांद्याच्या मुद्द्यावरून सानप या तरुणाने जोरदार घोषणाबाजी केली होती. मोदींचे भाषण ◀◀ पान २ वर

लोकसभा निवडणुकीच्या ६ व्या टप्प्यातील ३९ टक्के उमेदवार कोट्याधीश

नवी दिल्ली । वृतसंस्था

सध्या देशात लोकसभा निवडणूका पार पडत आहे. या लोकसभा निवडणूकीसाठी आतापर्यंत चार टप्पे पार पडले आहेत. तर लोकसभेचा पाचवा टप्प्यासाठी २० मे रोजी मतदानाचा पार पडणार आहे. पाचव्या टप्प्यासाठी मतदान पार पडल्यानंतर लगेच २५ मे रोजी लोकसभा निवडणुकीचा सहावा टप्प्यासाठीच्या मतदानाच्या प्रक्रियेसाठी सुरुवात होणार आहे. या सहाव्या टप्प्यात निवडणूक लढवणारे सुमारे ३९% उमेदवार कोट्यधीश आहेत ज्यांची सरासरी मालमत्ता ६.२१ कोटी असल्याची माहिती एडिआर या संस्थेने दिली.

२५ मे रोजी सहाव्या टप्प्यात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांमध्ये कुरुक्षेत्रातील भाजपा उमेदवार नवीन जिंदाल यांनी सर्वाधिक १,२४१ कोटी रुपयांची संपत्ती घोषित केली आहे, त्यानंतर संतरुप मिश्रा यांची ४८२ कोटी रुपये आणि सुशील गुप्ता यांची १६९ कोटी रुपयांची संपत्ती आहे, अशी माहिती एडिआरने विश्लेषणाच्या आधारे दिली. लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या ८६६ उमेदवारांपैकी ३३८ (३९%) कोट्यधीश आहेत आणि लोकसभेच्या सहाव्या टप्प्यातील निवडणूक लढवणाऱ्या प्रति उमेदवाराची सरासरी मालमत्ता ६.२१ कोटी असल्याचेही सांगितले.

प्रमुख पक्षांमध्ये बीजेडीचे सर्व सहा उमेदवार, आरजेडी आणि जदयूचे प्रत्येकी चार उमेदवारांपैकी चार उमेदवार, भाजपाच्या ५१ उमेदवारांपैकी ४८ (९४%), सपाच्या १२ पैकी ११ (९२%) उमेदवार, काँग्रेसच्या २५ उमेदवारांपैकी २० (८०%), आप मधील ५ उमेदवारांपैकी ४ (८०%) आणि एआयटीसी मधील ९ उमेदवारांपैकी ७ (७८%) उमेदवारांनी१ कोटींपेक्षा जास्त संपत्ती जाहीर केली आहे.

अग्रलेख

धोरणांच्या कसोटीत भारत यशस्वी व्हावा !

मागच्या अनेक वर्षांपासून आपण ज्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्रयत्नरत होतो तो चाबहार बंदर विकास प्रकल्पाचा करार नुकताच भारत व इराणमध्ये झाला आहे. चाबहार बंदर विकास हा भारताच्या व्यापारवाढीसाठीच नव्हे तर भू-सामरिक आणि आर्थिक धोरणासाठीही महत्त्वाचा प्रकल्प आहे. चाबहार बंदरातील आपली उपस्थिती केवळ आर्थिक-व्यापारी दृष्टिकोनातूनच नव्हे तर व्यूहरचनात्मक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ती का? हे समजावून घेण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या या बंदराचे असणारे स्थान लक्षात घ्यावे लागते. चाबहार हे इराणमधील सिस्तन-बलुचिस्तान प्रांतात येते, तर पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात ग्वादर हे बंदर येते. दोन्ही बंदरे आग्नेय आशिया-पश्चिम आशिया दरम्यान सागरी मार्गावर मोक्याच्या स्थानी वसलेली आहेत. चीनने आपल्या 'बेल्ट अँड रोड' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत ग्वादर बंदर विकासासाठी पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य केलेले आहे.

चाबहार बंदराचे महत्त्व कमी करण्यासाठीच ग्वादर बंदराच्या विकासाचा खटाटोप चीन व पाकिस्तानकडून सुरू आहे. मात्र, पाकिस्तानातील अस्थैर्य, बलुचिस्तानमधील जनतेचा या प्रकल्पास व चीन सहभागास असणारा विरोध यामुळे ग्वादर बंदराच्या विकासाला हवी ती गती अद्याप मिळालेली नाही. पाकिस्तानवरचे आपले व्यापारी अवलंबित्व कमी करण्यासाठी व चीनच्या वाढत्या प्रभावाला उत्तर देण्यासाठी ग्वादर बंदराच्या विकासापूर्वी चाबहार बंदराच्या विकासाचे काम पूर्ण होऊन हे बंदर पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत होणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. तसेच ते इराणसाठीही तेवढेच महत्त्वाचे आहे. भारताबाहेर भारताकडून विकसित होत असलेले चाबहार हे पहिलेच बंदर असणार आहे. चाबहार बंदर नियोजित प्रकारे विकसित झाले, तर अफगाणिस्तान मार्गे मध्य आशिया, युरोप, रशिया अशी विशाल बाजारपेठ भारतासाठी कमी वाहतूक खर्चात खुली होईल. यासाठी महागडा हवाई मार्ग वापरण्याची गरज संपुष्टात येईल. भारताला खनिज तेल, नैसर्गिक वायू आणणे देखील सोयीचे होईल. दक्षिण आशियाचा मध्य आशिया व युरोपशी व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने उत्तर-दक्षिण वाहतूक मार्गिकेची संकल्पना भारत-रशिया व इराणने मांडली होती. चाबहार बंदर विकासाच्या कराराने त्या दिशेने पहिले पाऊल पडले आहे. मात्र, त्यात आता पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थिती व अस्थैर्य यामुळे मोठा खोडा निर्माण होण्याची शक्यता आहे. रशिया-युक्रेन युद्ध व इस्रायल-हमास संघर्ष यामुळे पुन्हा एकवार जगाची दोन गटांत विभागणी होते की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. इराणने इस्रायल-हमास संघर्षात हमास बंडखोरांना रसद पुरविणे व इस्रायलविरोधात उघड विरोधी भूमिका घेणे सुरू केले आहे. तर रशिया-युक्रेन युद्धात रशियाची बाजू घेऊन त्यांना ड्रोन सामग्री पुरविली आहे. त्यामुळे इराणने पुन्हा एकवार अमेरिकेची नाराजी ओढवून घेतली आहे. इराण पुन्हा एकवार आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकी पडल्याचे चित्र आहे. इराण व रशिया या दोन देशांशी आजही ज्या मोजक्या देशांचा व्यवहार सुरू आहे त्यात भारताचा समावेश आहे. याबाबत अमेरिकेने भारतावर डोळे वटारलेले आहेत. मात्र, भारताची अपरिहार्यता लक्षात घेऊन कठोर निर्बंधांचे पाऊल अमेरिकेने अद्याप उचललेले नाही. आता चाबहार बंदर विकासाच्या करारानंतर मात्र अमेरिकेने भारताबाबत निर्बंधाची भाषा वापरली आहे. अमेरिका असे निर्बंध भारतावर खरोखरच लादणार का? त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतील याचा विचार भारताला हा करार पुढे नेताना नक्कीच करावा लागणार आहे. यात भारताच्या परराष्ट्र धोरणाची कसोटी लागणार आहे.

संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखी मिरवणुकीने पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात

भव्य कीर्तन भवनाने बंकटस्वामींच्या आध्यात्मिक वैभवात भर-महादेव महाराज

शोभा यात्रा आणि भव्य पालखी मिरवणुक डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा; स्वानंदसुखनिवासी जोग महाराज वारकरी किर्तनभवनाचे उद्घाट

नेकनूर । प्रतिनिधी

भव्य पालखी शोभायात्रा हजारो कलशधारी महिला, शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्रीक्षेत्र नेकनूर येथे बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या थाटात सुरुवात झाली.संत महंतांच्या हस्ते टाळ,विना,मृदंग,पालखी आणि ग्रंथ पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेव आनंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, वसंत महाराज शिंदे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें.

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या थाटात सुरुवात झाली.. यावर्षी नव्याने अभिनव उपक्रम घेत शोभा यात्राव भव्य पालखी मिरवणूक सकाळी ८ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी ते कीर्तन मंडप या ठिकाणी करण्यात आले यावेळी पिवळ्या रंगाच्या आणि भगव्या रंगाच्या साड्या परिधान करून कलशधारी १००० सुवासिनी महिला , कुमारीका मुली सहभागी झाल्या होत्या.. बंकटस्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरी याच्या

पाऊलीच्या खेळाने लक्ष वेधून घेतले. आठ दिवस होणाऱ्या या भव्य पुण्यतिथी उत्सवात राष्ट्रिय भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपुर यांच्या रसाळ वाणीतून कथा संपन्न होत आहे..कीर्तन,भजन,हरिपाठ या अध्यात्माच्या ज्ञानाबरोबर जनप्रबोधनाची मोठी रेल चेल असणार आहे.महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक,वादक तसेच बंकटस्वामी फडावरील सर्व वारकरी मंडळींची उपस्थिती राहणार आहे. सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकटस्वामी संस्थानच्या वतीने महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे. संत बंकटस्वामी महाराज संस्थान वर १२० २०० फुटाचा तब्बल २४ हजार स्कवेअर फुटाच्या भव्य किर्तन भवनाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर,श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज,श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प महादेवानंद भारती. श्री ह भ प तुकाराम महाराज भारती, यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले यावेळी जोग महाराज वारकरी कीर्तनभवनाने बंकटस्वामींच्या आध्यात्मिक वैभवात भर पडेल असा विश्वास महादेव महाराज तात्या यांनी व्यक्त केला.

धारूर शहरवासीयांची शिकलकरी कुटुंबांना संसार उपयोगी साहित्याची मदत

किल्लेधारुर । प्रतिनिधी

बीएसएनएल चा मनोरा पडून नुकसान झालेल्या शिकलकरी समाजातील नऊ आपदग्रस्त कुटुंबाना शहवासीयाच्या वतीने आधार म्हणून शुक्रवारी ता.१७ संसार ऊपयोगी भांडीकुंडी देवुन मदत करण्यात आली.

मागील आठवडच्यात शिकलकरी वस्तीवर दुरसंचारचा मनोरा पडुन झालेल्या दुर्घटनेत नऊ कुटुंबे उघड्यावर आली होती. अशा कुटुंबांना आधार म्हणून संसार उपयोगी साहित्य देण्यात आले,देशातील सर्वात मोठी समजली जाणारी शासनाची दुरसंचार कंपनीचा मनोरा वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे शिकलकरी वस्तीवर

पडला.वास्तविक चार वर्षापुर्वी शिकलकरी बांधवानी शासनाला दिलेल्या निवेदनानुसार कार्यवाही केली आसती तर दुर्घटना टळली असती.मात्र शहरवासीयांनी दुर्घटना घडताच ताबडतोब वा-या पावसाची तमा न करता धाव घेवुन जख्मींना शासकिय दवाखान्यात हलवले.त्यासोबत आपदग्रस्तांना नांदेड गुरुद्वारा प्रबधक समीतीने शिधा व धान्य दिले पण त्यांची अडचण लक्षात घेवुन शहवासीयाच्या लोकसहभागातुन आपदग्रस्त नऊ कुटुंबाना प्रत्येकी मोठी स्टिलची बादली, चार ताटे,चार वाट्या, ग्लास, परात,चार कोपरी, जग, चाळणी, पकड,चमचा,उलथणे यासह साहीत्याचे किट करुन मदत दिली.यावेळी संदीप शिनगारे ,गौतम शेंडगे ,धिरज काळे,अमरसिंह दिख्खत, डाँ.नवनाथ चव्हाण ,प्रकाश काळे, योगेश अंधारे, नाना चव्हाण, नाथा चव्हाण, रमेश जाधव, रामेश्वर मनेरी, गणेश ओमनवार, पत्रकार बांधव व नागरीक उपस्थीत होते.

शासकीय टँकर पाणी पुरवठा योजनेत पाप करू नका; नसता जण आंदोलन उभारणार-प्रा.ईश्वर मुंडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे अशा गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो परतु ज्या गावांना टँकर मंजूर आहेत त्या गावांना नियमित टँकरणे पाणीपुरवठा होत नाही ग्रामीण भागातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करावा अशी मागणी प्राध्यापक ईश्वर मुंडे यांनी नायब तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

धारूर तालुक्यासह बीड जिल्हा दुष्काळाच्या झळा सहन करत आहे. जिल्ह्यात जनावरांसाठी चारा छावण्या,मानसे व जनावरांसाठी पिण्याचे पाणी या साठी शासनाने आवश्यक त्या उपाय योजना केलेल्या नाहीत.कांही ग्राम सेवकांच्या हलगर्जीपणामुळे

वेळेवर टँकर मागणीचा प्रस्ताव सादर न झाल्यामुळे पाण्यावाचून जनतेचे हाल झालेले आहेत. कांही गावांत टँकर मंजूर झालेले आहे परंतू प्रत्यक्ष टँकर ने पाणी पुरवठा सुरू झालेला नाही.शेवटी बील काढताना टँकर मंजूर झालेल्या दिनांकापासून काढले जाईल कांही गावात जेवढे मंजूर टँकर खेपा आहेत त्याही नियमितपणे टाकल्या जात नाहीत.अशा तक्रारी आपल्याकडे आल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी कांबळे, तहसिलदार, संतोषवंगवाडे गटविकास अधिकारी, धारूर तसेच प्रसिध्दी माध्यमांना सांगितले मानसांना किंवा जनावरांना पाणी पाजणे पुण्य समजले जाते परंतू धारूर तालुक्यात अशा प्रकारे शासकीय पाणी पुरवठा टँकर योजनेत पाप करणे चालू आहे ते करू नका टँकर योजनेची नियमाप्रमाणे नियमित कसून चौकशी करून कडक नियंत्रण ठेवावे. अन्यथा तहसिलदार,गट विकास अधिकारी, धारूर यांच्या विरोधात जन आंदोलन उभारले जाईल असा ईशारा प्रा.ईश्वर मुंडे,राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष यांनी लेखी निवेदनाद्वारे तहसिलदार व गट विकास अधिकारी,धारूर यांना दिला आहे. टँकर पाणी पुरवठा बाबत जनतेच्या कांही अडचणी असतील तर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई,बीड वाट्सप मो.क्र.७२७६३२५८९६ / ८६६८३८१४१५ वर किंवा माझ्या ९०९६६८८३६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे अवाहन प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी केले आहे.

पान १वरून...

महाराष्ट्रात २० मेपर्यंत

पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुणे, सातारा, नाशिक, जळगावमध्ये पावसाच्या रिमझिम सरी पडण्याची शक्यता असते. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, गारपीट आणि सोसाट्याचा वारा (५०-६० किमी प्रतितास वेग) व मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तीव्र चक्रीवादळ धडकणार,

आहे. वादळी वाऱ्यासह पडत असलेल्या या पावसामुळे अनेक भागांमध्ये शेतपिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेल्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. राज्यात आणखी दोन दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिट होण्याची शक्यता हवामान विभागाने आपल्या अंदाजात व्यक्त केली आहे. तर २३ ते २७ मे दरम्यान, महाराष्ट्रासह ओडिशा, गुजरात या राज्यांना चक्रीवादळाचा फटका बसणार असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.

पुतिन प्रमानेच

आहात तर आमने-सामने लढा. देशातील लोकतंत्र संवण्याचा प्रयत्न सुरु आहे, असा घणाघात केजरीवाल यांनी केला. शरद पवार यांना पंतप्रधान मोदी यांनी भटकती आत्मा म्हटले. एका वरिष्ठ राजकीय नेत्याला असं बोलणे योग्य आहे का? शिवसेना फोडली पण, उद्धव ठाकरेंना नकली शिवसेना म्हणत आहेत. यांना आपल्याला निवडणुकीत धडा शिकवायचा आहे. मोदींनी सर्व नेत्यांना बाजूला केले आहे. आता फक्त योगी आदित्यनाथ राहिले आहेत. त्यांना देखील बाजूला केले जाईल, असे केजरीवाल म्हणाले.

आता तरी कटुता संपवा;

जातीय राजकारणाला पूर्णविराम यावेळी मिळत असतो. मात्र यंदाच्या निवडणुकीमध्ये जिल्हा वाशियांना भलताच अनुभव येत आहे. निवडणुकीत मराठा आणि ओबीसी संघर्ष पाहायला मिळाला तो मतदान झाल्यावर संपेल असे वाटत असतानाच काही लोकांकडून जाणीवपूर्वक सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकण्यात येत आहेत. यातून बीड जिल्ह्यातील सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे काम अशा बेलगाम तरुणांकडून केले जात आहे. पूर्वी गावातले एक दोन मुलं जर चुकीचं वागत असतील तर त्यांना घरातील जेष्ठ मंडळी आणि गावातील प्रतिष्ठित लोकांकडून समज दिली जात होती . त्यामुळे त्याकाळी चुकीचे पाऊल उचलताना तरुण अनेक वेळा विचार करत होते. यंदा बीड लोकसभा निवडणुकीमध्ये एवढे जातीचे विष पेरले गेले की ते विष आणि त्या विषयाचा प्रभाव अजूनही समाजाच्या मानगुटीवर बसलेला आहे. आज राजकारणी एकमेकांचे विरोधक आहेत, पुढे चार-दोन महिन्यांनी तेच एकाच कार्यक्रमात सोबत बसून जेवताना दिसले तर ज्यांनी या नेत्यांसाठी सोशल मिडीयावर आग ओकली, आपल्याच समाज बांधवांना खडेबोल सुनावले, खालच्या पातळीवर जावून आपले मत मांडले, अशा तरूणांनी त्या वेळी काय करावे? याचा विचार आज सर्वांनी करायला हवा. मराठा आणि वंजारी समाजातील जे काही तरुण दोन्ही समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट टाकत आहेत खऱ्या अर्थाने त्यांना समाजातील जेष्ठ लोकांनी व खास करून त्यांच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींनी समजावून सांगण्याची गरज आहे. तुमच्यामुळे समाजात दुश्मनी निर्माण होत आहे, तुमच्या पोस्टमुळे गावागावांमध्ये एकोपा राहिला नाही, दगडफेक होत आहे, माणूस माणसाला बोलत नाही, माणूस माणसाच्या कामी पडत नाही, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होताना माणसं विचार करू लागली आहे, त्यामुळे भावांनो आता तरी शांत रहा, सामाजिक सलोखा जपा, चांगलं करता येत नसेल तर वाईटही करू नका, जे काही सुरू आहे ते बीड जिल्ह्याच्या भवितव्यासाठी कदापि चांगले नाही, अशाच एका पोस्टमुळे केज तालुक्यात दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाली, महिलेसह तिघेजण जखमी झाले, ३०७ सारखा गंभीर गुन्हा दाखल झाला, जर ती पोस्ट टाकली नसती तर मित्रांनो आज ते गाव गुन्ह्या गोविंदाने नांदत असते. मात्र आज त्या गावांमध्ये अशांतता आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यासाठी आपण प्रत्येकाने सामाजिक सलोखा जपण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकण्याची गरज आहे. त्याची सुरुवात आज आणि आत्ताच करूया चार लोकांना तुम्ही फोन करा, ज्यांची भेट होईल त्यांना विनंतीपूर्वक सांगा, की बाबांनो यात काही पडले नाही. तुमचे आमचे रक्त सारखेच आहे, नावही सारखंच आहे, एकाच गावात राहतो, मग कसला दुरावा? निवडणुका झाल्या आता तो विषय संपलेला आहे. जातीपातीच्या भिंती गळून पडू द्या, अशी विनंती आपण सर्वजण प्रत्येकाला करूया. तरच येणाऱ्या काळात तरी अशा पोस्ट तरुण मंडळी पुन्हा सोशल मीडियावर टाकणार नाहीत.

अवकाळीचा तडाखा;

आणि म्हैस मयत झाले. गुरुवार दि.१६ रोजी संध्याकाळी विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने शहर व तालुक्यात हजेरी लावली. या अवकाळीच्या तडाख्यात तालुक्यातील मौजे पोहणेर ता परळी येथील शेतकरी अंकुश रामकीसन काकडे याच्या शेतात बांधलेल्या बैलावर वीज पडून बैल जागीच मरण पावला तर तालुक्यातील मौजे डाबी येथील चांगदेव महादेव मुंडे यांच्या म्हशीवर वीज पडून म्हैस जागीच मरण पावली. पशुधनाचे नैसर्गिक आपत्ती मध्ये मरण पावल्याची नोंद महसूल विभागाने घेतली आहे.

बस-मोटारसायकलची

सदरील घटना समजताच आमचे मित्र तथा आमदार सुरेश धस यांचे निकटवर्तीय शेख आसेफ व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन सदरील युवकाचे आधारकार्ड पाठवून मयत युवकाची माहिती मिळवली. मयताचे नातेवाईक तिथे पोचेपर्यंत त्याच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरून शवविच्छेदन करून शव आलेल्या त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देईपर्यंत संपूर्ण सहकार्य केले.

सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकाऱ्यांनी

यामुळे पाणी पुरवठा करण्यात मोठ्या प्रमाणात गैर व्यवस्थापन निर्माण झालेले आहे. शासनाची सर्व यंत्रणा हि लोकसभा निवडणूकीत गुंतलेली असल्यामुळे पाणी टंचाई विभागावर दुर्लक्ष होत आहे. यामुळे नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. जनते बरोबरच ग्रामीण भागातील जनावरांनाही मोठ्या प्रमाणात पाणी लागते. बीड शहरातही मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाल्याने बीड शहरात २० ते २२ दिवसाला पाणी येत असल्याने पाणी वितरण प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक आहे. बीड शहरातील पाणी पुरवठा हा किमान आठ दिवसाला करण्यात यावा. या बाबत नगर परिषद प्रशासनाला तातडीने सूचना देण्यात याव्यात व ग्रामीण भागातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा या बाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. ग्रामीण भागात पाणी टंचाई दुर करण्यासाठी इंधन विहिरी घेणे आवश्यक आहे. परंतु इंधन विहिरींचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. पण वरिष्ठ व कनिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या जागा रिक्त असल्यामुळे इंधन विहिरींचे सर्वेक्षण होत नाही. बीड जिल्ह्यातील प्रकल्पातील बुडित क्षेत्रात एम.आर.ई.जी.एस. अंतर्गत पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या करीता तातडीने विहिरी सुरु करण्यात याव्यात या करीता पंचायत समिती प्रशासनाला सुचना देण्यात याव्यात. तरी वरील सर्व बाबीवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मोदींच्या सभेत घोषणाबाजी

सुरू असताना थेट घोषणा देण्याची हिंमत दाखवणारा किरण सानप चांगलाच चर्चेत आला होता. कांदा निर्यातबंदी आणि कांद्याच्या भावामुळे नाशिकमधील शेतकरी अस्वस्थ आहेत. मात्र, तरीही पंतप्रधान मोदी आपल्या भाषणात कांद्याच्या मुद्द्याला स्पर्श करणार नसतील, तर कोणीतरी आवाज उठवणारच, असे शरद पवार यांनी म्हटले होते. तसेच सानप हा शरद पवार गटाच्या आयटी सेलचा पदाधिकारी असल्याची माहिती समोर आली होती. यावरून भाजपने शरद पवार गटावर पलटवारही केला होता. मात्र, मोदींच्या सभेत कांद्याच्या मुद्द्यावरून घोषणा देणारा तरुण माझ्या पक्षाचा असेल, तर मला त्याचा अभिमान आहे, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले होते. यावेळी बोलताना सानपने, तिथे घडलेला घटनाक्रम माध्यमांशी बोलताना उलगडून सांगितला. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर फोन जप्त करून चौकशी केली. रात्री उशिरा मला घरी सोडले. आता विरोधक माझ्यावर टीका करत आहेत. सभेमध्ये मी कुठेही शरद पवार यांच्या घोषणा दिल्या नव्हत्या. २०१९ पासून मी राष्ट्रवादीत काम करतो. मी केवळ एक शेतकरी म्हणून सभेला गेलो होतो. पवारसाहेबांनी अभिमान असल्याचे सांगितले, त्यामुळे माझा ऊर भरून आला असल्याचेही सानपने सांगितले.

काँग्रेसने जनतेची नव्हे, चेल्या

महाविद्यालय तसेच शाळा मिळाल्याने काँग्रेसच्या चेल्या चपाट्यांची गरिबी हटली. विशेष म्हणजे शिक्षकांच्या वेतनामध्ये अर्धे तुम्ही आणि अर्धे आम्ही, यातून गावात रोजगार हमी अशी परिस्थिती काँग्रेसच्या सत्ता काळात होती, अशी टीका शुक्रवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली. धुळे लोकसभा मतदारसंघातील शिंदखेडा येथे शुक्रवार (दि. १७) महायुतीचे उमेदवार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, लोकसभेचे समन्वयक तथा राज्यसभेचे खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्यासह आ.जयकुमार रावल, आ.मंगेश चव्हाण, आ.काशीराम पावरा, डॉ. राजेंद्र फडके, माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. या सभेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काँग्रेसवर टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्रपणे जल शक्ती विभाग तयार केला. प्रत्येक गावाला पिण्याचे पाणी मिळावे तसेच पुरापासून नुकसान थांबावे यासाठी गंगा कावेरी योजनेप्रमाणे योजना राबवल्या गेल्या. गोदावरी नदीपात्रातील तेराशे टीएमसी पाणी समुद्रात वाहून जाते. त्यामुळे गोदावरीचे पाणी कृष्णा नदीत, कृष्णा नदीचे पाणी पेडगर नदीत आणि पेडगर नदीचे पाणी कावेरी नदीमध्ये टाकून तामिळनाडू आणि कर्नाटक पर्यंत हे पाणी नेले. यातून या दोन राज्यांमधला पाण्याचा वाद देखील संपवण्याचे काम सरकारने केले आहे. या देशात १९७० पासून राज्या राज्यात नदीच्या पाण्यावरून वाद होते. पण आपण या विभागाचे मंत्री झाल्यानंतर २३ पैकी १७ भांडणे संपवले. या अंतर्गत संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्यांना एका खोलीत बसवून चर्चा केली. त्यामुळेच हे यश आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पाण्याच्या विषयाला प्राथमिकता दिली गेली. येणाऱ्या काळात देखील या विषयाला अशाच पद्धतीने प्राथमिकता दिली जाणार आहे. खाणींमध्ये असलेले पाणी सोलर पंपांच्या माध्यमातून लिफ्ट करून त्यातून वीज आणि सिंचनाच्या कामांना वापर केला गेला. अशाच प्रकारच्या योजना हिमाचल प्रदेशात देखील केल्या गेल्या. शेतकरी कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी अशा योजना करू शकते. देशात काँग्रेसच्या माध्यमातून पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी गरीबी हटावचा नारा दिला. पण गरिबांची गरिबी हटली नाही. काँग्रेसने त्यांच्या चेलाचपाट्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालय, प्राथमिक शाळा वाटल्या. या शाळांमधून शिक्षकांच्या पगारामधून देखील डल्ला मारण्यात आला. त्यामुळे शिक्षकांच्या पगारात अर्धा तुम्ही, अर्धा आम्ही आणि गावात रोजगार हमी, अशा पद्धतीने काँग्रेसच्या चेला चपाट्यांची गरिबी हटली. काँग्रेसने त्यांच्या साठ वर्षाच्या सत्ता काळात एक पाव डटाव, आणि गरीबी हटाव, या उक्तीप्रमाणे काम केले. गरिबी हटवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले नाही, असे गडकरी म्हणाले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.१८ मे २०२४ ३

वैद्यनाथ मंदिर परिसरात अपघात रोखण्यासाठी गतिरोधक बसवा अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन-अभयकुमार ठक्कर

परळी । प्रतिनिधी

पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर येथील रस्त्यावरून अत्यंत वेगाने मोठमोठी वाहने जात असल्यामुळे अपघातांमध्ये वाढ झाली असून, या ठिकाणी गतिरोधक बसवण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर व त्यांच्या सहकार्यांनी केली आहे. पंधरा दिवसात गतिरोधक न बसवल्यास आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक भक्त मोठया प्रमाणात दर्शनासाठी दररोज येत असतात. सध्या उन्हाळी सुट्टी असल्याने भाविकांची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. या रोडवरून मोठमोठी वाहने वेगात वाहने धावत आहेत. या मार्गावरून येणारी वाहने वैद्यनाथ मंदिर परिसरात एकत्र येऊन समोरासमोर येत आहे. त्यामुळे अपघाताची परिस्थिती ओढवत आहे. परळी नगर परिषदेने याकडे त्वरीत लक्ष देवून या ठिकाणी गतिरोधक बसवावेत अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोल करण्यात येईल असाही इशारा श्री अभयकुमार ठक्कर यांच्यासह मोहन परदेशी, माजी शहर संघटक संजय कुकडे, किशन बुंदिले, संजय सोमाणे, अमित कचरे,लक्ष्मण मुंडे, योगेश घेवारे आदींनी दिला आहे.

घराची वाटणी मागितलीस तर तुला जीवे मारू

अंबाजोगाईतील महिलेची सवतीसह त्यांच्या मुलांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पतीच्या निधनानंतर मी अंबाजोगाई शहर सोडून आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहुन उपजिविका भागवत आहे. परंतु माझ्या पतीच्या नावावर असलेली जागेची वाटणी मागीतली असता सवतीसह तिच्या मुलांनी जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांच्या विरोधात अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात चौंघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अंबाजोगाई शहरातील जनाबाई मुरलीधर जाधव (वय ४२) व्यवसाय मजूरी रा.विद्याकुंज कॉलनी प्रशांत अंबाजोगाई येथील रहिवासी असून पती मुरलीधर जाधव यांचे निधन झाल्यानंतर मी व माझी आई, भाऊ असे आम्ही एकत्र आळंदी येथील धोंडोपंत दादासाहेब आतरे यांच्या मंदिरात राहत आहोत. तेथील मंदिरातील झाड-झोड करून आम्ही आमची उपजिविका भागवतो. माझे पती मुरलीधर जाधव हे पंधरा वर्षापुर्वी मयत झाले असून १६ मे रोजी सकाळी १० वाजता मी माझ्यावडीलांसह बंधुप्रेम कॉलनी प्रशांत नगर भागातील आलो असता माझी सवत कमलबाई मुरलीधर जाधव, शिवाजी मुरलीधर जाधव, बालाजी मुरलीधर जाधव या तिघांकडे माझ्या नावाची वाटणी मागीतली असता त्यांनी मला शिविगाळ करून शिवाजी शेप, रा.शेपवाडी याने पण मला शिविगाळ करून सर्वांनी मिळून मला म्हणाले की, तु जर वाटणी मागीतलीस तर तुझा काटा काढून टाकू अशी जिवे मारण्याची धमकी मला दिली. वरील चौंघांनी जिवे मारण्याची धमकी दिली आहे. अशा प्रकारची फिर्याद शहर पोलिस ठाण्यात दाखल झाली असून पुढील तपास पोलिस जमादार आरसुळ हे करीत आहेत.

आळंदी येथील मंदिरात सेवा करून भागविते उपजिविका

माझे पती मुरलीधर जाधव यांचे १५ वर्षापुर्वी निधन झाल्यानंतर मी माझ्या मुलीसह आळंदी येथील एका मठामध्ये वास्तव्यास गेले. तेथील मठाधिपतींना माझी परस्थिती सांगीतल्यानंतर त्यांनी साफ सफाईचे काम मला दिले. या कामातून मिळणार्या तुटपूंज्या पैशातून माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागविला. या मोल मजुरीतूनच मिळालेल्या पैशातूनच मुलीचा विवाह देखील करून दिला. परंतु माझ्या नवर्याच्या नावाने अंबाजोगाई येथील असलेल्या जागेतील वाटणी मागीतली असता त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मी कायदेशिर बाजूने न्याय मागीतला आहे. कायद्यातून न्याय मिळाला नाही तर माझ्या कुटूंबासह बेमुदत आंदोलन करणार असल्याचे तक्रारदार जनाबाई जाधव यांनी सांगितले.

दोन दिवसांच्या शिळ्या भाकर्या घेवून पिडीत महिलेने पोलिसांकडे मागीतला न्याय

दोन दिवसांपुर्वी आळंदी येथून आलेल्या महिलेने मठात मिळालेल्या भाकरी घेवून अंबाजोगाईचे शहर पोलिस ठाणे गाठले या भाकरीवर तीने दोन दिवस काढले. पोलिसांनी या महिलेची हाकीकत जाणल्यानंतर लागलीच सदरील आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला परंतु पोलिस या महिलेला न्याय देतील का? हे पहावे लागेल. पोलिस ठाण्याचे एफआयआर प्रत घेवून मिडीयाकडे आली असता त्यांनी दोन दिवसांचे शिळे तुकडे दाखविल्यामुळे या घटनेचे गांभीर्य मिडीयाला लक्षात आले या प्रकरणात पोलिस कितपत न्याय देतात हे पहावे लागेल.

भिमजन्मभूमीच्या विकासासाठी डॉ.राहुल धाकडे यांनी पुढाकार घ्यावा - अमर हबीब

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भिमजन्मभूमीच्या विकासासाठी मिळालेल्या संदीचा सदुपयोग करून डॉ.राहुल धाकडे यांनी आपल्या कल्पकतेतून नविन संकल्पना तिथे राबवावी. व भिमजन्मभूमीच्या विकासासाठी आपले योगदान द्यावे. अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यीक तथा किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी व्यक्त केली.

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध श्वसन व छातीविकार तज्ञ डॉ.राहुल धाकडे यांची भिमजन्मभूमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटी, महु जिल्हा इंदोर (मध्यप्रदेश) च्या राष्ट्रीय कार्यकारीणीवर निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा अंबाजोगाईकरांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यीक अमर हबीब बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद अंबाजोगाईचे अध्यक्ष दगडू लोमटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, ज्येष्ठ साहित्यीक अमर हबीब, प्रा.डॉ.कमलाकर कांबळे, आधार मल्टीस्टेटचे अध्यक्ष ॲड.सुनिल सौंदरमल, डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, स्वाराती रूग्णालयाचे मेडीसीन विभाग प्रमुख डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, दंत वैद्यक परिषदेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, प्रा.डी.जी.धाकडे उपस्थित होते. यावेळी बोलताना अमर हबीब म्हणाले की, डॉ.राहुल धाकडे यांचे सर्वच क्षेत्रात मौलीक योगदान आहे. सर्वगुण संपन्न असणारे हे नेतृत्व सर्वच पातळ्यांवर यशस्वी ठरले आहे. कोणतेही काम हाती घेतल्यानंतर त्या कामात स्वतःला झोकून देवून काम करण्याची त्यांची भूमीका त्यांना पुढे घेवून गेली. जसा त्यांनी आपल्या कार्याचा ठसा वैद्यकीय सेवेत उमटविला त्याच पद्धतीने सामाजिक, धार्मिक, साहित्यीक, क्रीडा, सांस्कृतीक क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. या आष्टपैलु नेतृत्वाला भिमजन्मोभूमीच्या कार्यकारीणीवर निवड झाल्याने अंबाजोगाईकरांची मान उंचावली आहे. आगामी काळात त्यांना अनेक संधी उपलब्ध असल्याची अमर हबीब यांनी सांगितले. यावेळी नंदकिशोर मुंदडा, राजकिशोर मोदी, डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.नरेंद्र काळे, डॉ.नवनाथ घुगे, ॲड.सुनिल सौंदरमल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समोराप दगडु लोमटे यांनी केला. यावेळी डॉ.धाकडे यांनी आपण अंबाजोगाईची मान कायम उंचावेल असेच कार्य करणार असल्याचे उपस्थितांनसमोर सांगितले. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.राहुल धाकडे यांचा भिमजन्मभूमीची प्रतिकृती, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुजीब शेख यांनी केले तर संचलन आनंत कांबळे यांनी व उपस्थितांचे आभार भिमाशंकर शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमास मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जैन श्रावक संघाच्या अध्यक्षपदी धनराज सोळंकी तर उपाध्यक्षपदी ऋषभ मुथा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री.वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ अंबाजोगाईच्या अध्यक्षपदी धनराज गौतमचंद सोळंकी यांची, तर उपाध्यक्षपदी ऋषभ संतोष मुथ्था यांची निवड करण्यात आली आहे.

शुक्रवारी भगवंत सुमतीनाथ भगवान व आचार्य भगवंत शिवमुनी महाराज यांच्या दिक्षा दिनानिमित्त आज झालेल्या विविध कार्यक्रमात उपप्रवर्तक अक्षय ऋषी महाराज, अमृत ऋषी महाराज, गितार्थ ऋषी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यकारीणी घोषित करण्यात आली. अध्यक्ष धनराज गौतमचंद सोळंकी, उपाध्यक्ष ऋषभ संतोष मुथ्था सह उपाध्यक्ष सौरभ महावीर कर्नावट, मंत्री आनंद ताराचंद बडेरा, सहमंत्री प्रतिक बोथरा, कोषाध्यक्ष यश महावीर बडेरा तर आनंद विहार समिती, संजय सुराना, आदेश कर्नावट, प्रविण सोळंकी, आनंद कर्नावट यांची निवड करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गौतमचंद सोळंकी, शांतीलाल सेठीया, सुभाष बडेरा, प्रकाश सोळंकी, राजेंद्र कात्रेला, रिकब सोळंकी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. जैन श्रावक संघाच्या नविन पदाधिकार्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

आष्टी तालुकाध्यक्षपदी पत्रकार आण्णासाहेब साबळे यांची निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राज्यासह राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची आष्टी तालुकाध्यक्ष पदाची घोषणा जाहीर करण्यात आली.दि.१२ मे रोजी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या नवीन २०२४ च्या आष्टी तालुकाध्यक्ष पदाची घोषणा जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे,राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब यांच्या आदेशानुसार आष्टी तालुकाध्यक्ष पदी दैनिक लोकमंथन,दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क,दैनिक प्रभास केसरीचे प्रतिनिधी आण्णासाहेब दिनकर साबळे यांची निवड जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली.आण्णासाहेब साबळे यांच्या निवडीचे मित्रपरिवार व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

बस स्थानकात २४ तास फिल्टरचे थंड पाणी

सामाजिक कार्यकर्त्याचा पुढाकार

परळी । अनुप कुसुमकर

प्रचंड उन्हाळ्याचे दिवस आणि सुट्टीचा कालावधी असल्याने परळी बस स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे.प्रवाशांना बस स्थानकावर शुद्ध आणि थंड पाणी पिण्यास मिळावे यासाठी वागबेट येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी बस स्थानक परीसरात पाणपोई उभी केली असून २४ तास प्रवाशांना फिल्टरचे शुद्ध थंड पाणी पिण्यास मिळत आहे.

परळी शहरातील बस स्थानकातील आवारात बांधण्यात आलेल्या पाणपोईची प्रचंड दुरावस्था झाली असून कित्येक वर्षा पासून हि पाणपोई धूळ खात पडून आहे.त्यातच उन्हाळ्याच्या झळा वाढल्या असून सुट्टीचा कालावधी असल्याने प्रवाशांची मोठी गर्दी बस स्थानकात होत आहे.१२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले परळी येथील वैद्यनाथ मंदिर, सुट्टीचा कालावधी यामुळे बस स्थानकात शहरा बाहेरून मोठ्या प्रमाणावर बस येत-जा करतात. त्यातून हजारो प्रवाशांची वर्दळ रोजच पहावयास येत असते.तर ग्रामीण भागात सुध्दा जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. परंतु बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने अनेकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवन करावी लागत असून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेऊन नागरिकांना आपली तहान भागवावी लागत आहे.त्यामुळे गरीब प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असे.

बस स्थानकात प्रवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने नागरीक व प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल सुरू असल्याचे निदर्शनास येताच परळी तालुक्यातील वागबेट येथील सामाजिक कार्यकर्ते महारुद्र गित्ते यांनी स्वखर्चाने बस स्थानक परिसरात पाणपोई उभी केली असून या ठिकाणी २४ तास शुद्ध फिल्टर केलेले थंड प्रवाशांची तहान दूर करत आहे.महारुद्र गित्ते यांनी बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिल्याने प्रवाशी समाधान व्यक्त करत आहेत.

भर उन्हाळ्यात बस स्थानकावर प्रवाशाची पाण्यासाठी होत असलेल्या दैना पहावली नसल्याने बस स्थानकात आगार प्रमुखांच्या परवानगीने मागील एक महिन्यापासून फिल्टरचे थंड पाण्याचे जार २४ तास स्वखर्चाने प्रवासांच्या सेवेत सुरू केले असून थोड्याच दिवसात मोंढा बाजारात देखील पानपोई उभारण्यात येणार आहे.

महारुद्र गित्ते, सामाजिक कार्यकर्ते, वागबेट, परळी

शेतीच्या वादातून महिलेस मारहाण

शिरूर : आमची शेती वाटून का देत नाही म्हणत घरात स्वयंपाक करत असलेल्या महिलेला चौघा जणांनी संगणमताने शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना तालुक्यातील आनंदगाव या गावी बुधवार दि. १५ मे रोजी रात्री घडली असून शिरूर पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर कासार तालुक्यातील आनंदगाव येथील रूपाली गणेश विघ्ने (२८) या महिलेने शिरूर पोलीस स्टेशनला दिलेले फिर्यादी नुसार रूपाली विघ्ने ही महिला बुधवार दि.१५ मे रोजी सायंकाळी आपल्या घरात स्वयंपाक करत होती आरोपी अंबादास किसन विघ्ने, अशोक अंबादास विघ्ने,चंद्रकला दिलीप विघ्ने हे चौघेजण घरात आले आणि आम्हाला आमची शेती वाटून का देत नाहीस असे म्हणत अंबादास विघ्ने व अशोक विघ्ने यांनी शिवीगाळ केली तर कविता विघ्ने हिने हातात असलेला विळा रुपालीच्या हातावर मारल्याने हाताला इजा होऊन मोठा रक्तश्राव झाला. त्याच बरोबर लोखंडी गजाने हे मारहाण झाली आहे. रुपाली गणेश विघ्ने यांच्या फिर्यादी वरून शिरूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भगवंताने माणसाला चांगले जीवन व देह दिला आहे त्याचा समाज सेवेसाठी उपयोग करावा-गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

भगवंताने माणसाला चांगले जीवन व शरीर देह दिलेला आहे त्याचा समाजसेवेसाठी उपयोग करावा तसेच माणसाने आपल्या जीवनामध्ये आपण दुसऱ्यासाठी काही करत इतरांसाठी,स्वतःसाठी,कुटुंबासाठी जीवन जगले पाहिजे असा संदेश गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज (मठाधिपती श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी) यांनी अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी जमलेल्या जनसमुदायाला दिला.

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज यांचा दि.१५ मे २०२४ बुधवार रोजी पिंपळवंडी पंचक्रोशी मंडळ व तरुण मंडळाचे वतीने ७४ वा (वर्ष-३ रे) अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या जल्लोषात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.या निमित्त महादेवानंद भारती महाराज यांचे आकर्षक रथातून येथील पाटील वस्ती पासून श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय कार्यक्रम स्थळापर्यंत डीजेच्या ताफ्यासह तोफा-फटाकेच्या आतषबाजीत व कलश धारि महिलांसह भव्य-दिव्य मिरवणूक संपन्न झाली.

यावेळी व्यासपीठावर महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज,ह.भ.प.अमृत महाराज जोशी,विष्णू देवानंद महाराज, संतोष भारती महाराज,शिवानंद भारती महाराज,भागवत पुरी महाराज,रामानंद महाराज,शिवाजी महाराज हनुमान टेकडी, दत्ता महाराज,पांडुरंग महाराज कुंभार, मिनाताई मडके महाराज,परमानंद भारती महाराज,प्रेमानंद महाराज,बजगुडे महाराज आदीसह युवराज काशीद अजय काशीद (वस्ताद),बाबासाहेब चव्हाण (सेवानिवृत्त पीएसआय),राजू भैया जाधव,भाऊसाहेब भवर,निलेश मोरे,उद्धव शेठ पवार,श्रीपती गाडे, ॲड.एन.एन.साबळे,ॲड.मंगेश पोकळे,प्रा.जोगदंड सर,विश्वजीत जायभाये आदींची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराजांचे अभिष्टचिंतन करण्यात येऊन त्यांचा वैयक्तिक व ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार घालून व फेटा बांधून भव्य सत्कार करण्यात आला.तसेच महादेवानंद भारती महाराज यांच्या हस्ते पिंपळवंडी परिसरातील अनेक ज्येष्ठ व्यक्तींचा पुष्पहार,श्रीफळ,फेटा बांधून व फोटो फ्रेम तसेच महिलांचा साडी व फोटो फ्रेम देऊन सन्मान करण्यात आला. तसेच महादेवानंद भारती महाराज आपल्या सत्कार भाषणातून म्हणाले की,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम महाराजांनी मराठी भाषा शिकविली आहे.पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मला जे प्रेम आजपर्यंत दिले येथून पुढेही देतील यात शंकाच नाही.येथील तरुण मंडळीचे कौतुक करावे ते थोडेच आहे. तुमचे सर्वांचे कल्याण व्हावे ही देवाला प्रार्थना करतो.श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवस्थान हे पूर्वी शासकीय ट्रस्ट होते. परंतु,मी स्वतः घटना तयार करून हे संस्थान पब्लिक ट्रस्ट करून घेतले. याचा यावेळी आवर्जून उल्लेख केला. तसेच या परिसरातील शेत जमीन ओलिताखाली यावी यासाठी मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून पिंपळवंडी साठवण तलाव व बेदरवाडी धरणासाठी प्रयत्न करून दोन्हीही तलावामुळे येथील शेतकऱ्यांची हरितक्रांती झाल्याचे चित्र पाहवयास मिळत आहे.तसेच शेतकऱ्यांनी शेतीत विविध जातीच्या फळांची लागवड करून कष्ट व मेहनत केली तर शेतीत उत्पादन घेता येते असे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सुरू करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय दूर केली.तसेच श्री क्षेत्र पंढरपूर येथे भव्य- दिव्य मठ स्थापन करून वारकऱ्यांची निवाऱ्याची सोय केली आहे.मठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा व मंदिर बनवले आहे.तसेच महाराष्ट्रात कोठेही पाहायला मिळणार नाही असे या ठिकाणी साडेअकरा टन वजनाची महाशिव पिंड व साडेसात फूट उंचीचे शिवलिंग बनविले आहे.त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा,तुकडोजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले आदींच्या मूर्ती स्थापन करण्यात येऊन पंढरपूरच्या मूर्ती स्थापनेचा सोहळा लाईव्ह करण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला.या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील आजी-माजी सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,चेअरमन,पत्रकार तसेच पिंपळवंडी, अंमळनेर,कोतन, भडकेल, खोपटी,पांगरी,कुसळंब, नाळवंडी, डोंगरकिन्ही,पाटणसांगवी, लिंबागणेश, सुपा, चापडगाव,आंतरवली आदी गावातील व पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा व ह.भ.प.अमृत जोशी महाराज यांच्या किर्तनाचा लाभ घेतला.

अवघ्या ४५ दिवसांत ५ लाखांची कमाई

एसी पोल्ट्रीतून शेतकऱ्याने साधली प्रगती

अनादी काळापासून शेती समवेतच कुकुटपालनाचा आणि पशुपालनाचा व्यवसाय केला जात आहे. कुकुट पालन व्यवसायात नवनवीन हायटेक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. शेतीला जोडधंदा म्हणून कुकूटपालन व्यवसाय केला जातो. मात्र, शेतीसमवेत केला जाणारा हा शेतीपूरक व्यवसाय अलीकडील काही वर्षांमध्ये विशेष लोकप्रिय बनला आहे. अनेकांना कुकुट पालन व्यवसायातून चांगली कमाई देखील होत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील डोंगरगण येथील रावसाहेब पटारे यांनी देखील कुक्कुटपालन व्यवसायातून लाखो रुपयांची कमाई करून दाखवली आहे. रावसाहेब यांनी एसी पोल्ट्री फार्म सुरू करून लाखो रुपयांची कमाई करून दाखवली आहे. त्यांनी अवघ्या ४५ दिवसात एसी पोल्ट्री फार्म मधून पाच लाख रुपये कमावले आहेत. यामुळे त्यांचा नाशिक येथे पोल्ट्री इंडिया एक्सपोकडून सत्कार करण्यात आला आहे.

साधनांची उपलब्धता : केवळ कामगारांच्या भरवशावर या व्यवसायात यश मिळवता येणे अशक्य आहे. ते सांगतात की, एसी पोल्ट्रीमध्ये ॲटोमॅटीक हवामान ठेवणारे कन्ट्रोलर असतात. पाण्यासाठी

निपललाईन, खाद्यासाठी फीडरलाईन, फीडर लाईनला खाद्य पाठविणारे सायलो बंदिस्त असते. हवा आत येण्यासाठी कुलिंग पॅड आणि आतील दूषित हवा बाहेर फेकण्यासाठी असलेले फॅन असतात. या व्यवसायातील हे सर्व घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. याशिवाय एसी पोल्ट्रीत वीज हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. यासाठी २४ तास वीज मिळणे आवश्यक आहे.

थायलंडच्या कंपनीने उभारले शेड : रावसाहेब यांनी युट्युबवर ऑस्ट्रेलियातील एसी पोल्ट्री फार्मचा एक व्हिडिओ पाहिला होता. दरम्यान त्यांनी या एसी पोल्ट्री फार्मची शोधाशोध केली. एसी पोल्ट्री फार्मची शोधाशोध करत असताना त्यांना थायलंड येथील कंपनी अशा प्रकारचे शेड बनवत असल्याचे समजले. थायलंड मधील सीपीएफ नावाची कंपनी असे शेड बनवत असल्याने त्यांनी या कंपनीशी संपर्क साधला. मात्र आपल्या परिसरात असे शेड नसल्याने त्यांना सुरुवातीला अडचणीचा सामना करावा लागला. मात्र त्यांनी या कंपनीच्या मदतीने एसी शेड तयार केले. किती झाली कमाई? : २०१८ मध्ये त्यांनी ब्रॉयलर पक्षांची पहिली बॅच टाकली. म्हणजेच ते जवळपास सहा वर्षांपासून एसी पोल्ट्री फार्म चालवत आहेत. विशेष म्हणजे ते विविध ठिकाणी जाऊन कार्यशाळेत एसी पोल्ट्री फार्मची माहिती देखील देत आहेत. त्यांनी कृषी विषयात शिक्षण घेतलेले आहे. त्यांना आजच्या घडीला या व्यवसायातून चांगली कमाई होत आहे. रावसाहेबांनी अवघ्या ४५ दिवसात म्हणजेच दीड महिन्याच्या कालावधीत एसी पोल्ट्री मधून पाच लाख रुपयांची कमाई केली आहे. यामुळे त्यांचा नुकताच नाशिक मध्ये सत्कार झाला असून, नवयुवक तरुणांनी शेतीसोबतच इतर पूरक धंदे सुरू केले तर त्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते हेच त्यांच्या या प्रयोगातून सिद्ध होत आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १४९८ : वास्को-द-गामा भारतातील कालिकत बंदरात दाखल झाला.
- १८०४ : नेपोलिअन बोनापार्ट फ्रान्सचा सम्राट झाला.
- १९१२ : पूर्णपणे भारतात बनवलेला मूकपट 'पुंडलिक' प्रदर्शित झाला.
- १९३८ : 'प्रभात'चा 'गोपालकृष्ण' हा चित्रपट मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमात प्रदर्शित झाला.
- १९४० : 'प्रभात'चा 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट मुंबई व पुणे या ठिकाणी एकाच दिवशी प्रदर्शित झाला.
- १९७२ : कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना.
- १९७२ : दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली.
- १९७४ : भारताने पोखरण येथे आण्विक अस्त्राची पहिली यशस्वी चाचणी केली.
- १९९० : फ्रान्स च्या टीजीव्ही रेल्वे ने ५१५.३ किमी/ताशी वेगाने धावण्याचा नवीन जागतिक विक्रम केला.
- १९९१ : रशियाच्या सोयुझ अंतराळातुन भ्रमण करणारी हेलन शेरमन ही महिला पहिली ब्रिटिश अंतराळयात्री बनली.
- १९९५ : स्थानिक ठिकाणचे ५,००० रुपयांपर्यंतचे धनादेश खात्यात भरल्यानंतर तिसर्या दिवशी ती रक्कम ग्राहकास काढण्याची मुभा द्यावी, असा आदेश 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ने दिला.
- १९९८ : पुण्याच्या सुरेन्द्र चव्हाणने जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर केले.
- २००८ : भारतीय पार्श्वगायक नितीन मुकेश यांना मध्यप्रदेश सरकारने भारतीय राष्ट्रीय पुरस्कार लता मंगेशकर देऊन त्यांचा सन्मान केला.
- २००९ : श्रीलंका सरकारने एलटीटीई ला पराभूत करून सुमारे २६ वर्षच्या युद्धाला संपवले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १०४८ : ओमर खय्याम पर्शियन तत्त्वज्ञ, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी (मृत्यू: ४ डिसेंबर ११३१)
- १६८२ : छत्रपती शाहूराजे भोसले, संभाजीराजे व माहाराणी येसुबाई यांचे पुत्र.
- १८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील भारतीय कवी, साहित्यकार, लेखक आणि समाजसुधारक तसचं, महिलांच्या हक्काचे रक्षणकर्ते व बालविवाहविरोधक उत्कृष वकील बहरामजी मेरवानजी मलबारी यांचा जन्मदिन.
- १८७२ : ब्रिटिश गणितज्ञ, तत्त्वज्ञ आणि इतिहासकार बर्ट्रांड रसेल यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९७०)
- १९१३ : पुरुषोत्तम काकोडकर गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेसचे नेते, ५ व्या लोकसभेचे सदस्य (मृत्यू: २ मे १९९८)
- १९१४ : भारतीय रिजर्व बँकेच्या दहाव्या गव्हर्नर एस. जगन्नाथ यांचा जन्मदिन.
- १९२० : पोप जॉन पॉल (दुसरा) (मृत्यू: २ एप्रिल २००५)
- १९२२ : नार्वे देशातील मानसोपचारतज्ञ जर्डा बोयेसन यांचा जन्मदिन.
- १९३३ : एच. डी. देवेगौडा, भारताचे अकरावे पंतप्रधान.
- १९७७ : भारतीय इलेक्ट्रिकल्स लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व भारतीय उद्योग व्यवस्थापक अनंत बजाज यांचा जन्मदिन.
- १९७९ : माईनक्राफ्ट या गेम चे सहसंस्थापक जेन्स्? बर्गेस्टन यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८०८ : बोर्नबॉन व्हिस्की चे निर्माते एलीया क्रेग यांचे निधन.
- १८४६ : मराठी पत्रकारितेचे पितामह बाळशास्त्री जांभेकर यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १८१२)
- १९६६ : वनस्पतीशास्त्रज्ञ पंचानन माहेश्वरी यांचे निधन. (जन्म: ९ नोव्हेंबर १९०४)
- १९८६ : कानरू लक्ष्मण राव, स्थापत्य अभियंता.
- १९९७ : कमलाबाई रघुनाथराव गोखले, पहिल्या स्त्री चित्रपट कलाकार.
- १९९९ : पहिले राष्ट्रीय बुद्धीबळ विजेते रामचंद्र सप्रे यांचे निधन.
- २००९ : एल. टी. टी. ई. चे संस्थापक वेल्लुपल्ली प्रभाकरन यांचे निधन. (जन्म: २६ नोव्हेंबर १९५४)
- २०१२ : भारतीय धार्मिक नेते जय गुरूदेव यांचे निधन.
- २०१७ : भारतीय अभिनेत्री रीमा लागू यांचे निधन. (जन्म: २१ जुन १९५८

परभणी कृषी विद्यापीठाची बियाणे विक्री उद्यापासून सुरु होणार

परभणी : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शनीचे आयोजन शनिवारी (ता.१८) सकाळी ११ वाजता कृषि महाविद्यालय परभणी येथील सभागृहात करण्यात आले आहे. या कार्यक्रमावेळी विद्यापीठाकडून यंदाच्या खरीप हंगामासाठीची बियाणे विक्री सुरु केली जाणार आहे. याशिवाय शनिवारी विद्यापीठ विकसित तंत्रज्ञान तसेच कंपन्याच्या आणि बचतगटाचे साहित्याचे कृषि प्रदर्शनीचे आयोजन देखील करण्यात आले आहे.

तूर : तुरीचे बीडीएन-७१६ (लाल), बीडीएन-७११ (पांढरी), ६ किलोच्या बॅगमध्ये तर बीडीएन-१३-४१ गोदावरी (पांढरी) हे वाण ६ आणि २ किलोच्या बॅगमध्ये उपलब्ध असून प्रती किलो दर २५० दराने उपलब्ध आहे. या बियाण्याची उपलब्धता बीडीएन-७१६ (८०० बॅग), बीडीएन-७११-(३६६ बॅग), बीडीएन-१३-४१ गोदावरी ६ किलोच्या ७०० बॅग व २ किलोच्या ३०० बॅग अशी आहे.

सोयाबीन : सोयाबीनचे एमएयुएस-१६२, एमएयुएस-१५८, एमएयुएस-७१, एमएयुएस-६१२ हे वाण २६ किलोच्या बॅगमध्ये तर एमएयुएस-७२५ हा वाण ५ किलोच्या बॅगमध्ये उपलब्ध असून, सर्व वाणाचा प्रती किलो दर हा १०० रुपये इतका आहे. याची बियाण्याची उपलब्धता एमएयुएस-१६२ (१००० बॅग), एमएयुएस-१५८ (१५०० बॅग), एमएयुएस-७१ (१७५ बॅग), एमएयुएस-६१२ (१००० बॅग) आणि एमएयुएस-७२५ (१६०० बॅग) अशी आहे.

ज्वारी : ज्वारीचा परभणी शक्ती हा वाण ४ किलोच्या बॅगमध्ये उपलब्ध असून, या वाणाचा प्रती किलो दर १२५ रुपये इतका आहे. या वाणाच्या ३०० बॅगची उपलब्धता आहे.

मुग : मुगाचा बीएम-२००३-२ हा वाण ६ किलोच्या बॅगमध्ये उपलब्ध असून, या वाणाचा प्रती किलो दर २२० रुपये इतका आहे. या वाणाच्या २१६ बॅगची उपलब्धता आहे.

कुठून कराल बियाणे खरेदी?

बियाणे खरेदीसाठी रोख रक्कम स्विकारण्यात येईल. तसेच एका व्यक्तीस एक बियाणे बॅग याप्रमाणे विक्री करण्यात येईल. या परिसंवादाचे थेट प्रक्षेपण हीींिः// ॅीींलिश.ले/ऽतछ्वघत विद्यापीठ युट्युब चॅनेलवर करण्यात येणार आहे. परिसंवादाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

उन्हाळ्यात जनावरांमध्ये होणारा हिटस्ट्रोक आणि उपाययोजना

पशुपालन करणे हे फार जिकरीचे काम असतं. तिन्ही ऋतूमध्ये जनावरांची काळजी घेणे आवश्यक असते. सद्या कडक उन्हाळा सुरू आहे. या दिवसात पशुधनाची काळजी घेणे आवश्यक असते. अति उष्णतेमुळे जनावरांनासुद्धा उन्हाळ्यात रक्तस्राव होत असतो. हा रक्तस्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये जनावरांच्या नाकातून लाल-गडद रंगाचे रक्त वाहते. अशा जनावरांना उपाय म्हणून त्यांच्या डोक्यावर थंड पाणी ओतावे. जनावरांना भरपूर थंड पाणी पिण्यास द्यावे. उन्हाळ्यात हिरव्या वैरणीची टंचाई, पिण्याच्या पाण्याची टंचाई असे अनेक प्रश्न निर्माण होतात आणि मुकी जनावरे या समस्येला सतत तोंड देत असतात. अशा परिस्थितीत जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. हे आजार झाल्यास काय उपाय करावे व आजार होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याबाबत माहिती शेतकऱ्यांना असणे आवश्यक आहे.

नाकातील रक्तस्राव : अति उष्णतेमुळे माणसांप्रमाणेच जनावरांनासुद्धा उन्हाळ्यात रक्तस्राव होत असतो. हा रक्तस्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये जनावरांच्या नाकातून लाल-गडद रंगाचे रक्त वाहते. अशा जनावरांना उपाय म्हणून त्यांच्या डोक्यावर थंड पाणी घालावे. जनावरांना भरपूर थंड पाणी पिण्यास द्यावे. हिरवा चारा द्यावा. जनावरे झाडाखाली किंवा गोठ्यात बांधावीत. रक्तस्राव थांबत नसेल, तर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने जनावरांना जीवनसत्त्व ''क आहारातून किंवा औषधाच्या माध्यमातून द्यावे.

विषबाधा : उन्हाळ्यात हिरव्या वैरणीच्या कमतरतेमुळे जनावरे मिळतील त्या हिरव्या वनस्पती खात असतात, यामुळे विषारी वनस्पती बेशर्म, घाणेरी, गुंज, धोतरा खाण्यात येतात व जनावरांना विषबाधा होते. जनावरे गुंगल्यासारखी करतात, खात नाहीत, खाली बसतात व उठत नाहीत. त्यानंतर पाय सोडून

ताबडतोब मरतात. विषबाधेची लक्षणे दिसताच पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाय करावेत.

उष्माघात : हा आजार अतिप्रखर सूर्याच्या किरणांमुळे व पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेमुळे होतो. उष्माघातामुळे जनावरांच्या शरीराची कातडी कोरडी पडते, जनावरे थकल्यासारखी होतात, भूक मंदावते, दूध देणे कमी होते. यावर उपाय म्हणून जनावरांच्या अंगावर थंड पाणी ओतावे किंवा ओले कापड किंवा गोणपाट जनावरांच्या डोक्यावर ठेवावे व त्यावर वारंवार पाणी मारावे. अशा जनावरांना झाडाखाली किंवा गोठ्यात बांधावे. भरपूर प्रमाणात स्वच्छ थंड पाणी व चारा द्यावा. शक्य असल्यास पाण्यात मीठ व साखर टाकावी.

कडव्या : हा आजार अति प्रखर सूर्यप्रकाशामुळे जनावरांच्या कातडीला होतो. हा आजार प्रामुख्याने ज्या जनावरांच्या चामडीचा रंग पांढरा असतो, त्या जनावरांत याचा प्रादुर्भाव जास्त दिसतो; कारण पांढरा रंग असणाऱ्या जनावरांच्या कातडीत (चामडीत) ''मेलेनीन नावाचा घटक कमी प्रमाणात असतो; तसेच चाऱ्याच्या अभावामुळे भुकेपोटी जनावरे गाजर (काँग्रेस) गवत खात असतात आणि अशी जनावरे सूर्यप्रकाशात अधिक वेळ राहिली असता हा आजार होतो. या गवतातील विषारी घटक व सूर्यप्रकाशाचा परिणाम कातडीवर दिसून येतो. उपाय म्हणून जनावरांना सावलीत बांधावे. भरपूर प्रमाणात थंड पाणी द्यावे. उपचारासाठी पशुवैद्यकाचे मार्गदर्शन घ्यावे.

कॅल्शिअमची कमतरता : उन्हाळ्यामध्ये हिरव्या चाऱ्याअभावी शेतकरी जनावरांना उसाचे वाढे खाऊ घालतात. वाढे जास्त प्रमाणात खाल्ल्यामुळे वाढ्यामधील ऑक्झेलेट खनिज व जनावरांच्या शरीरातील कॅल्शिअम एकत्र होऊन लघवीवाटे निघून जाते, त्यामुळे कॅल्शिअमची पातळी कमी होते. त्यामुळे जनावरांना ''मिल्क फिव्हर'' नावाचा रोग होतो, त्यामुळे जनावरे थकून एकदम खाली बसतात. शरीराचे तापमान कमी होते, रवंथ बंद होते, जनावरे खात नाहीत, दूध देणे कमी होते, शरीर थंड पडते, जनावरे मान टाकून बसतात. यावर तातडीने पशुवैद्यकाकडून उपचार सुरू करावेत.

फळबागेसाठी खड्डा भरणी आणि जमिनीची निवड

आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे सर्वांना परिचित असतेच. जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत, मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. फार खोल असणाऱ्या जमिनी, क्षारयुक्त जमिनी, चोपण जमिनी यातून पाण्याचा निचरा योग्य होत नाही अशा जमिनीत प्रारंभी झाडे वाढल्यासारखी दिसली तरी पुढे वाढीचा वेग मंदावतो व उत्पादन मिळत नाही. काही वेळा झाडे मरण्याची संभावना असते.तसेच ज्या जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण १० % पेक्षा जास्त आहे अशा जमिनीत फळबागेची वाढ होत नाही.

फळबागेची आखणी आणि अंतर : फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे, तेंव्हा जमिनीची आखणी

करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार (कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी, आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य अशी पद्धत प्रामुख्याने सर्वत्र वापरली जाते. आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडातील आणि दोन रोपातील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

फळबाग लागवडीचे अंतर : विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा, हे खड्डे केंव्हा घ्यावेत आणि केंव्हा भरावेत आणि कसे हे माहिती असले पाहिजे. जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे, तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा.खड्डे खोदण्याचे काम उशिरात उशिरा एप्रिल महिन्यात पूर्ण करावे.

सर्व साधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठया विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ बाय १ बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकारच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ से. मी. व लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० से.मी आकारचे खड्डे घ्यावेत. जमीन डोंगर उताराची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी.

फळबागेसाठी खड्डा कसा भराल? : खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे तीन आठवडे तापू द्यावे, जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडूळखत + २ ते ३ किलो लिंबोळी पेंड २५ ग्रॅम टायकोडर्मा जीवाणू +१५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू +२५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ से.मी उंच भरून ठेवावा.म्हणजे पावसाळ्याच्यासुरुवाती बरोबर लागवड करता येईल.

फळबाग लागवडीची योग्य वेळ : खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेबर-ऑक्टोबर मध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली समाधानकारक वाढतात. काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात.जून-जुलै पर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते. फळझाडांच्या लागवडीसाठी योग्य आकाराचा खड्डा, योग्य अंतरावर एप्रिल-मे महिन्यातच खोदावेत. उन्हाळ्यात खड्डे तापू द्यावेत. खड्डा भरताना तळाला पालापाचोळा टाकून १५ ते २० किलो चांगले कुजलेले शेणखत व पोयटा माती व १ ते १.५ किलो सिंगल सुपर फॉसपेट व ५०-१०० ग्रॅम फॉलीडॉल पावडर यांच्या मिश्रणाने मे महिन्याच्या दुसऱ्यादुसऱ्या पंधरवाड्यात अथवा जून च्या पहिल्या आठवड्यात भरून घ्यावा. दोन चांगले पाऊस पडून गेल्यावर सर्वसाधारणपणे जून- जुलै महिन्यात रोपांची/कलमांची लागवड करावी.रोपे/कलमे खात्रीशीर रोपवाटिकेतूनच खरेदी करावीत.

अर्धवट सोडलेला बायपास सिमेंट रस्ता तात्काळ सुरू करा

आझादनगर संघर्ष समितीचे न.प.ला निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील आझाद नगर येथे होत असलेल्या सिमेंटरस्त्याला नपचे इंजिनीयर व माजी नगरसेवक आळा घालत आहेत.राजकीय सूड भावनेने हा प्रकार केल्या जात आहे.त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांचे अर्धवट झालेल्या रस्त्यामुळे हाल होत आहेत.त्यामुळे हा रस्ता तात्काळ सुरू करण्यात यावा,नसता, आझाद नगरजवळ राष्ट्रीय महामार्गावर दि.२० मै रोजी रास्ता रोको करन्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला.

माजलगाव नगर परिषदेत भ्रष्ट कारभाराने उच्चांक गाठला आहे. आझाद नगर येथे होत असलेला धारूररोड ते बायपास सिमेंट रस्त्याला नप मुख्याधिकारी, इंजिनियर व येथील एक माजी नगरसेवक राजकीय सुडभावनेने अडथळे आणत आहेत.जाणून बुजून हा रस्ता अर्धवट काम करून सोडला आहे.त्यामुळे रस्त्याविना येथील नागरिकांचे हाल होत आहेत.सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे.त्याचप्रमाणे शहरात झालेले नाली बांधकाम सिमेंट रस्ते पाईपलाईन निकृष्ट,बोगस दर्जाची झाली आहेत.या सर्व कामाची कॉलिटी कंट्रोलद्वारे तपासणी करन्यात

यावी,त्याचप्रमाणे ओपन स्पेसवरील सर्व अतिक्रमणे काढून शहरातील सर्व डीपी रोड चालू करण्यात यावेत यावेत.तसेच नप मध्ये आलेल्या शासकीय फंडात मोठा भ्रष्टाचार झाला आहे याचीही चौकशी करण्यात यावी.नसता दि २० मे रोजी आझाद नगरच्या पुलाजवळ राष्ट्रीय महामार्गावर माजी नगरसेवक स.सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. व पुढील आंदोलन विभागीय कार्यालयावर करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने नगरपरिषदेला देण्यात आला आहे.या निवेदनावर स.फारुखअण्णा,मेहबूब चुन्नू, रईसकादरी,शेख सादेक इब्राहिम, समशेरखान साहेबखान पठाण, सत्तारभाई टेलर,सय्यद रहीम फिटर,बाबासाहेब साळवे,सोनबा धिरे,शेख जमील,अतिक अन्सर खान,महेमुब मिरझा बेग,शेख इलियास मासुम,इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

आ.सोळंके यांनी रस्ता अडवला-सय्यद सलीम

शहरातील आजाद नगर ही हातावर पोट भरणाऱ्या गोरगरिबांची मोठी वस्ती आहे.ठिकाणी दलित,मुस्लिम मराठा,बहुजन अठरापगड जातीचे लोक राहतात.आ.प्रकाश सोळंके यांना या प्रभागातून मोठा राजकीय विरोध होतो.आशी आकस भावना मनात बाळगून आ.प्रकाश सोळंके या वस्तीकडे पाहत आले आहेत. हा होत असलेला सिमेंट रस्ताही त्यांनी मुख्याधिकारी,इंजिनियर व येथील एका माजी नगरसेवकाला हाताशी धरून राजकीय सूड भावनेने अडवल्याचा आरोप माजी नगरसेवक सय्यद सलीमबापू यांनी आ.सोळंके यांच्यावर केला आहे.

राऊतमारे कुटुंबावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने प्रशासनास निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण येथील अशोक राऊतमारे या ब्राह्मण कुटुंबाच्या घरावर दगडफेक करण्यात आली तसेच आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे कुटुंबाचे विरोधात घोषणा देत घरासमोरील वाहनांची तोडफोड करीत कुटुंबातील सर्वांना मारहाण करण्यात आली यासाठी घटनेचा सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे तसेच या प्रकरणातील हल्लेखोर गावगुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

बीड येथील ब्राह्मण कुटुंब आपल्या मतदानाचा हक्क कुर्ला गावी बजावून आले त्यानंतर गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत घरावर तुफान दगडफेक केली तसेच घरातील सर्व व्यक्तींना मारहाण करण्यात आली एवढ्यावरच न थांबता घरासमोरील वाहनांची तोडफोड करण्यात आली या घटनेचा माजलगाव ब्राह्मण समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला तसेच सदरील गावगुंडांना अटक करण्यात यावी व योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन माननीय तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले याप्रसंगी ब्राह्मण समाजाचे चंद्रकांत देशमुख, वैभव जोशी, दत्ता महाजन, प्रशांत पाटील, राजेश देशमुख, किरण करंजकर,अनिकेत भिलेगावकर, गणेश कुलकर्णी, पराग खोडसकर, स्वानंद नाईक, भालचंद्र पाठक अमोल जोशी व इतर समाज बांधव उपस्थित होते.

थोडक्यात

आर्वी येथे मंगळवारपासून वार्षिक हरिनाम सप्ताह

बीड : शिरुर तालुक्यातील आर्वी येथे मंगळवार २१ मे पासून वार्षिक अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात होणार आहे. यंदा सप्ताहाचे दुसरे वर्ष आहे. मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या नेतृत्वात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात ब्रह्मनाथ संस्थानचे महंत रामेश्वर शास्त्री यांची भागवत कथा होणार आहे. शिरुर तालुक्यातील आर्वी येथे गतवर्षीपासून वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह प्रथेला सुरुवात झाली आहे. मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या पुढकारातून या सप्ताह परंपरेला सुरुवात झाली आहे.यंदा २१ मे ते २७ मे या काळात सप्ताह होणार आहे. २१ मे रोजी गावातून शोभायात्रा काढून संत, महंताच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करुन सप्ताहाला सुरुवात होणार आहे. सप्ताहात उद्धव महाराज शास्त्री, योगीराज महाराज, हनुमान महाराज शास्त्री, शितलताई साबळे, सतीश महाराज, शिवाजी महाराज देशमुख, रोहिणीताई महाराज परांजपे यांची किर्तने होणार आहेत. २७ मे रोजी दुपारी ११ ते १ या वेळेत महंत स्वामी जनार्दन महाराज मत्स्येंद्रगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

कीड रोग व्यवस्थापन पुस्तकेत सुधारणा कळविण्याचे आवाहन

बीड: कृषी विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत ''भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास शिफारशी'' ही पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर पुस्तिकेमध्ये भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे पेरणीपासून काढणी पर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन या विषयी माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेच्या चा क्यु आर कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या . या मेलवर कळविण्यात यावे .असे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुण्याचे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

शेतक-यांनी १ जून पूर्वी कापसाची लागवड करु नये

बीड : सध्या अवकाळी पाऊस पडत असल्याने कापूस पिकावरील शेंदरी बोंडअळीच्या नियत्रंणासाठी कापसाची लागवड ही अशा अवकाळी पावसावर करणे योग्य होणार नाही. कापसाची लागवड ही कोणत्याही परिस्थितीत १ जून पुर्वी करण्यात येऊ नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. जून पूर्वी लागवड केल्यास शेंदरी बोंडअळीचे जीवनचक्र खंडीत होत नाही व अळीचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे येणारे उत्पादन गुणवत्तेत कमी पडते तसेच पिक उत्पादनाचा खर्च अधिक येतो. अशा मालाला दरही कमी मिळतो त्यामुळे पूर्व हंगामी लागवड किफायतशीर राहत नाही. शेतक-यांनी १ जून पूर्वी कापसाची लागवड करु नये.

कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षणासाठी अर्ज सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय बीड मार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुंटुबाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी त्यांना रोजगार व स्वयं रोजगाराची साधने उपलब्ध व्हावी म्हणून समाजातील गरजूना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. बीड जिल्हा कार्यालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांकरिता एकुण ५०० प्रशिक्षणार्थींचे कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट मुख्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. बीड जिल्हातील ज्या संस्थेने कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण पोर्टल वरिल नोंदणी केलेली आहे. अशा प्रशिक्षण संस्थेने ३१ मे २०२४ पर्यत शासनाच्या नियमानूसार सर्व आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतित प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे. अटी, शर्ती / निकषा नुसार प्रस्ताव सादर करावेत. तसेच खालील अटी, शर्ती / निकष लागु राहतील.

प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे करण्या दिनांक २० ऑगस्ट २०१९ मध्ये नमुद केलेल्या कोर्सेसची निवड प्रशिक्षणार्थींने करणे बंधनकारक राहिल. २)प्रशिक्षण संस्थेने निकर्षांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानूसार आवश्यक त्या परिक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहिल त्या शिवाय संस्थेची फी अदा केल्या जाणार नाही. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधी नुसार २० % ३०% ३०% २०% च्या प्रमाणात प्रशिक्षण फी अदा करण्यात येईल. संस्थेने अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनां अंतर्गत निवडलेल्या व्यवसायाचा कर्जाचा अर्ज सादर करण्यासाठी सुचित करावे.जिल्हा स्तरावर एका कोर्सेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी एकाच प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींची बायोमॅट्रीक पध्दतीने व हजेरी पटावर स्वाक्षरीने हजेरी घेणे बंधनकारक राहिल. संस्थेने विद्यार्थी निहाय प्रमाणित केलेली हजेरी पाठविल्या शिवाय संबधीत प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण फी अदा केली जाणार नाही. अर्जदार मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील असावा.अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.अर्जदाराने यापुर्वी शासनाच्या / महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ३००००००/- या पेक्षा जास्त नसावे. एका कुंटुबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याच्या तपशिल सादर करावा. वरील अटी शर्ती नुसार संस्था चालकाने ३१ मे २०२४ पर्यंत प्रशिक्षण संस्थेने प्रस्ताव दोन प्रतीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर नगर रोड बीड जिल्हा कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ०९:४५ ते संध्याकाळी ०६:१५ पर्यंत सादर करावेत. दि. ३१ मे २०२४ नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही यांची संबधितानी नोंद घ्यावी. असे आवाहन साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थपाक यांनी केले आहे.

युवकांनी सलोखा, बंधुत्व संबंध जोपासण्याची गरज-ॲड.राऊत

बीड । प्रतिनिधी

मागच्या काही दिवसांपुर्वी लोकसभा निवडणूक पार पडलेली आहे निवडणूक झाल्यानंतर देखील अनेक नव - युवक समाज माध्यमांवर अक्षपार्य पोस्ट , एखाद्या समाजावर खालच्या पातळीवर मजकूर करताना दिसत आहेत. असे केल्याने समाजा समाजात पोकळी निर्माण होत आहे. अशा पद्धतीच्या आक्षेपार्य पोस्ट समाज माध्यमांवर कोणी करू नये असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष (भाऊ) राऊत यांनी केले आहे.

बीड लोकसभा निवडणुकीचे मतदान हे एकुण सात टप्प्यांपैकी चौथ्या टप्प्यात (१३) मे रोजी संपन्न झाले . पूर्ण महाराष्ट्राचे लक्ष यावेळच्या बीड लोकसभा निवडणुकीकडे लागलेले पहायला मिळाले होते. या मागचे कारण पहायचे झाले तर मतदानाच्या काही काळापूर्वी झालेल्या संघर्षामुळे ही निवडणूक जातीय मुद्द्यांवर होण्याचे संकेत स्पष्ट निर्माण झाले होते. त्यामुळे यावेळची निवडणुक कसरतीची ठरणार असल्याचे चित्र तयार झालेले होते. या निवडणुकी वेळी पक्षाचा प्रचार असो की, उमेदवाराचा हा जास्त प्रमाणात समाज माध्यमांवर केलेला दिसून आला त्यावेळी उमेदवारांच्या समर्थकांकडून त्यांच्या उमेदवारांनी केलेला संघर्ष, उमेदवारांनी दिलेली आश्वासन, उमेदवारांनी केलेली विकासकामे आशा पोस्ट करत एक प्रकारे समाज माध्यमांवर देखील प्रचाराची रणधुमाळी रंगलेली पाहायला मिळाली होती. निवडणुका काळ समाप्त झाल्यानंतर देखील कार्यकर्त्यांनी तसेच चाहत्यांनी आपल्या उमेदवारांची ऐकलहाती बाजू लावून धरलेली पाहायला मिळत आहे त्यामुळे अनेक ठिकाणी शहरात तसेच गावांमध्ये तणावाचे वातावरण मागच्या काही दिवसापासून निर्माण होऊ लागले पहायला मिळत आहे या तणावाच्या वातावरणामुळे समाजा समाजात दूही निर्माण होण्याचे संकेत दिसत आहेत .अशा पद्धतीची दुफळी दोन समाजात निर्माण होऊ नये ,तसेच समाज माध्यमांवर केलेल्या पोस्टमुळे कोणत्याही समाजाची मने दु:खावली जाऊ नये यासाठी सर्व युवकांनी सलोखा, बंधुत्व संबंध जोपासावे तसेच समाज माध्यमांवरील विषमतेच्या मजकुरांना कोठेही थारा देऊ नये असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष सुभाष (भाऊ) राऊत यांनी केले आहे.

पारगाव सिरस येथे बैलगाडी शर्यतीमध्ये आली रंगत

शेकडो शेतकऱ्यांनी घेतला स्पर्धेमध्ये सहभाग

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे पारगाव सिरस येथे श्री. भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन सरपंच दिनकर जमदाडे यांच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जिल्ह्यासह राज्यभरातून शेतकर्यांनी आपल्या बैलगाडी सह सहभाग नोंदवला. या स्पर्धेची तयारी करत बीड तालुका व परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलाचा सराव करून घेऊन, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बैलासोबत सपर्धा केली. पूर्वी बीड जिल्ह्यामध्ये अशा स्पर्धा कमी प्रमाणात होयच्या परंतु पश्चिम महाराष्ट्राला लाजवेल अशा स्पर्धेचे आयोजन बीड जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधव आपल्या ग्रामदैवताच्या यात्रेनिमित्त करत आहेत.

या स्पर्धेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग व उत्साह मोठ्या प्रमाणात होता. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडी शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत. बीड जिल्ह्यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्रा सारख्या स्पर्धा होव्यात यासाठी सर्वात अगोदर पुढाकार घेणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी गेल्या दोन वर्षापासून उत्कृष्ट असे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत आहेत. बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे पारगाव (सि) येथे ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य भैरवनाथ केसरी (२०२४) बैलगाडी शर्यत आयोजित केली होती. या शर्यतीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थित आज संपन्न झाला. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यासह तालुक्यातील व परिसरातील शेतकरी बांधव, बैलगाडा प्रेमीची मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी राजांचा रांगडा खेळ असलेल्या बैलगाडी शर्यतीने शेतकरी मित्रांचे पशूधनावर असलेले प्रेम अनुभवास मिळाले. स्पर्धा या अतिशय उत्सहात संपन्न झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर दयावा

निवासी उपजिल्हाधिकारी यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

आगामी दिवसामध्ये उष्णतेची लाट जाणवू शकते. उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर दयावा. उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. तसेच उष्माघात उपचारासाठी शासकीय रूग्णालयांत सज्जता ठेवण्याच्या सुचनाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाला दिल्या आहेत.

उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रूममध्ये काम करणे, काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीतकामकरणे, घट्ट कपडयांचा वापर करणे, उष्णतशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येणे.शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्कहोणे, थकवा येणे, ताप येणे (१०२ पेक्षा जास्त) त्वचा कोरडी पडणे, भुक न लागणे, चक्कर येणे, निरूत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी, होणे. वय -५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मदयपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड, हद्?रोग, यकृत, त्वचा विकार, लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण या औषधींचे सेवन सुरू असलेले रुग्ण, जास्त तापमान, अति आर्द्रता, वातुनूकलनाचा अभाव, तंग कपडे, शेतकाम, कारखान्यातीलकाम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणा-या व्यक्ती.वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाचीकामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषून घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जलसंजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे. उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यक कामे असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्याअगोदर जेवण करावे, रिकाम्या पोटी उन्हात जावू नये, कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेल्मेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये. रुग्णास हवेशीर खालीत ठेवणे, खोलीत पंखे, कुलर ठेवावेत. शक्यतो वातानुकुलीत खोलीत ठेवावेत., रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रोग्याला बर्फाच्या पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवावे. आईसपॅक लावावेत, ओआरएससोल्युशन दयावे. उन्हाळयामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजनाकरणेसाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यकती सर्व तयारी ठेवणेबाबत कळविण्यात आलेले आहे. (उदा. हवेशीर खोली, पुरेसा औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इ. सुस्थितीत ठेवावी) यांचीसोय करावी. बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्माघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्माघात होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाद्वारे प्रचार माध्यमातून दयावी. काय करावे -तहान नसलीतरी भरपूर पाणी / सरबत प्यावे, हवा खेळती राहण्याकरीता पंख्याचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावे. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजुर वर्गास वारंवार विश्रांती घेवु दयावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर आलेकापड ठेवावे. मद्य,सोडा, कॉफी, अतीगार पाणी इ. पिणे, गरज नसतांना उन्हात बाहेर फिरणे, तंग, व गडदकपडे वापरणे, सवय आहे म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कार मध्ये राहणे, अति शारिरिक कष्टाचे कामे करणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

जिल्ह्यात पाणी टंचाई ; जिल्हा प्रशासनाची दिरंगाई

२४ तारखेला करणार अर्धनग्न अंघोळ आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाई वाढण्यास सुरुवात झाली आहे जिल्ह्यातील पाझर तलाव व अन्य जलाशयांमधील पाणीसाठ्याची अवस्था अतिशय चिंताजनक आहे. बहुतांश तलाव कोरडे पडले आहेत अशी पाण्याची टंचाई पाहता जिल्हाधिकारी बीड यांच्यासह प्रशासनाने उपाययोजना आखणे अपेक्षित होते तसे होताना दिसून येत नाही गंभीर प्रकरणाकडे जिल्हाधिकारी बीड व प्रशासन डोळे झाकपणा करत असल्याचे दिसून येत आहे.

बीड जिल्ह्यात नवीन तहसील कार्यालय बांधकाम, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय बांधकाम, नवीन बसस्थानाक, नवीन जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान बांधकामसह इतर खासगी बांधकामे जोमात सुरू आहेत बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाचे सुरू असलेले काम यासाठी लाखो-कोटी लिटर पाणी लागणार असून दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने सदरील सर्व कामे तात्काळ थांबविण्यात यावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी निवेदनाद्वारे केली होती. जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचारी यांनी विषयाला धरून पत्र काढणे अपेक्षित होते परंतु त्या उलट अडीच महिन्यानंतर पत्र काढून जिल्हा प्रशासन निष्काळजीपणाने वागत असल्याचे दिसून येत आहे. अशा कर्मचाऱ्यावर गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने कारवाई करावी व त्वरित खासगी बांधकामे, सरकारी बांधकामे, राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्गाचे कामे थांबविण्यात यावे अशी मागणी केली असून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २४ मे रोजी अर्धनग्न अंघोळ हे आंदोलन करत प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करणार असल्याचे वंचितचे युवा नेते अजय सरवदे यांनी सांगितले आहे.

नरेंद्र मोदींचा प्रचार भरकटला, धार्मिक ध्रुविकरणाचा प्रयत्न

पवन खेरा यांची टीका

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तोंड उघडले की वाद निर्माण होत आहेत. १० वर्षातील कामाचे रिपोर्ड कार्डच नसल्याने लोकांना सांगण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नाही. नरेंद्र मोदी, हिंदू मुस्लीम करत नाही असे सांगतात व दुसऱ्याच दिवशी पुन्हा हिंदू मुस्लीमवर भाषण देतात. नरेंद्र मोदींचा प्रचार भरकटला असून, मुद्देच नसल्याने मोदींना धार्मिक ध्रुवीकरणावर भर द्यावा लागत असल्याची घणाघाती टीका अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे चेअरमन पवन खेरा यांनी केली.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना पवन खेरा भाजपा व नरेंद्र मोदी यांच्यावर सडकून टीका करताना म्हणाले की, नरेंद्र मोदी सध्या मुलाखती देत सुटले आहेत, पण ते जे बोलतात त्यातून त्यांचेच हसे होत आहे. मोदीजी असे कोणते औषध घेतात की काल काय बोलले ते आज विसरतात आणि भलतेच बोलतात. मोदींच्या मुलाखती म्हणजे 'कपिल शर्माचा कॉमेडी शो' वाटतो. युक्रेन युद्ध थांबवले म्हणणारे नरेंद्र मोदी आता गाजा पट्टीतील युद्ध थांबवल्याची शेखी मिरवत आहेत. मोदी मणिपूरला जाऊ शकले नाहीत. मणिपूरचे नाव घ्यायची त्यांची हिम्मत झाली नाही आणि युद्ध थांबवल्याच्या बाता मारतात. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाचे हसे करुन ठेवले आहे. राहुल गांधी यांना शहजादे म्हणतात व राहुल गांधी बद्दल प्रश्न विचारताच कोन राहुल, असा उलटा प्रश्न विचारतात. राहुल गांधी शहजादा नाहीत तर शहिदजादे आहेत आणि देशात एकच शहजादा आहे आणि तो म्हणजे अमित शाह यांचा मुलगा जय शाह, असा टोलाही यावेळी लगावला. या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे व सोशल मीडियाचे चेअरमन विशाल मुत्तेमवार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया समन्वयक प्रगती अहिर उपस्थित होते.

दिक्षाभूमीवर जाऊन आत्मचिंतन करावे

महाराष्ट्रात दोन पक्ष फोडणारा भाजपा खरी तुकडे तुकडे गँग आहे आणि लोकांना ही तोडफोड अजिबात आवडलेली नाही. महाराष्ट्रात इंडिया आघाडीची हवा दिसत आहे आणि महाराष्ट्रातील वातावरणाचा परिणाम गुजरातसह देशभरात दिसत आहे. महाराष्ट्रात इंडिया आघाडी ३५ जागा जागांवर विजयी होईल असा विश्वास व्यक्त करत ४ जूनला नरेंद्र मोदी यांना झोळी घेऊन निघावे लागले, त्यांनी नागपुरला दिक्षाभूमीवर जाऊन आत्मचिंतन करावे असा खोचक सल्लाही नरेंद्र मोदी यांना खेर यांनी दिला.

नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम –पटोले

लोकसभा निवडणूक जनतेने हाती घेतली असून, भाजपा व नरेंद्र मोदी यांच्याविरोधात जनतेमध्ये प्रचंड राग आहे. महाविकास आघाडी बहुमताने जिंकेल असे चित्र दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात थोडीही माणुसकी राहिलेली नाही. घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटेनत १६ जण ठार झाले व ७० लोक जखमी झाले. मृतांच्या नातेवाईंकांची व जखमींची भेट घेवून त्यांचे सांत्वन करण्याची माणुसकीही पंतप्रधान मोदी यांनी दाखवली नाही. घाटकोपरमधूनच रोड शो काढून नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले, अशी टीका यावेळी केली.

उद्धव ठाकरे म्हणजे रंग बदलणारा सरडा

इतक्या जलद गतीने रंग बदलणारा सरडा कधी पाहिला नाही : एकनाथ शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

शिवाजी पार्क मैदानात गर्व से कहो हम हिंदू ही डरकाळी घुमत होती, पण आता उबाठाला हिंदू म्हणायची लाज वाटू लागली आहे. उबाठाला हिंदू म्हणवून घ्यायची लाज वाटत आहे, हिंदूहृदयसम्राट म्हणायला जीभ कचरू लागली आहे, मतांसाठी लाचारी सुरू असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली. माणूस किती बदलला हे पाहू शकतो, पण इतक्या

वेगाने रंग बदलताना सरडा पाहिला नाही, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे रंग बदलणारा सरडा असल्याची टीका केली.

बाळासाहेब ठाकरेंचं नाव घेण्याचा यांना नैतिक अधिकार नाही

एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरेंचं नाव घेण्याचा यांना नैतिक अधिकार नाही. तुम्ही आता बाळासाहेबांचा नाव घेण्याचा अधिकार सोडलेला आहे. ते म्हणाले की, काँग्रेसमध्ये उबाठा लोळत आहेत, बिघडलेलं पोरगं चुकीच्या वाटेला लागलं असं आपण म्हणतो. त्यात हे म्हणतात माझा बाप चोरला, अरे हे काय खेळणं आहे का? आम्हाला फक्त बाळासाहेबांचे विचार हवेत, तीच आमची संपत्ती असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

'तर तुमचा मतांचा अधिकार संकटात येईल'; शरद पवार यांचा मोठा दावा

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीचं पाचव्या टप्पातील मतदान येत्या २० मे म्हणजे सोमवारी होणार आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांच्या प्रचारतोफा धडाडण्यासाठी आता सुरूवात झाली आहे. भिवंडीमधील सभेमध्ये बोलताना शरद पवार यांनी मोठा दावा केला आहे.

आज नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी ठिकाठिकाणी सांगत आहेत की, आम्हाला ४०० पेक्षा अधिक जागा हव्या आहेत. का तर त्यांना देशाची घटना बदलायची आहे. कर्नाटकातील त्यांच्या एका खासदाराने जाहीरपणे घटना बदलायचं सांगितलं. उत्तर प्रदेशातील त्यांच्या खासदारानेही घटना बदलायचं सांगितलं आहे. राजस्थानमधील नेत्यानेही तेच सांगितलं. त्यासाठी

मोदींना मतं द्यायचं आहे. बाबासाहेबांनी दिलेला अधिकार संपवला जाईल, तेव्हा तुमच्यासारख्या कोट्यवधी लोकांचं अधिकाराचं अस्तित्व नष्ट होईल. त्या दिवशी देशात हुकूमशाही येईल, असं शरद पवार म्हणाले.

आज या देशाच्या राज्यातील शेतकरी संकटात आहे. कष्टकरी कामगार संकटात आहे. अल्पसंख्यांकांची स्थिती अवघड केली आहे. पंतप्रधान चुकीच्या पद्धतीने मंगळसूत्रावर बोलत आहे. उद्या आमच्या हातात सत्ता आली तर अयोध्येतील मंदिर संकटात येईल असं मोदी सांगत आहे. या देशातील मंदीर, मशीद, चर्च असो की इतर प्रार्थनास्थळं हे सुरक्षित आहेत. सुरक्षित राहील. पण मोदी काही कारण नसताना या विषयाला हात घालत आहेत. हे चुकीचं आणि गंभीर असल्याचं पवारांनी म्हटलं आहे. लोकसभेच्या निवडणुकीसाठी मोठ्या संख्येने तुम्ही उपस्थित आहात. या निवडणुकीतून तुमच्या माझ्या भविष्याचं नियोजन व्हायचं आहे. चिंतेची स्थिती ही आहे की, ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांना संधी मिळाली तर तुमचा मताचा अधिकार संकटात आल्याशिवाय राहणार नाही. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिलं, त्या घटनेने तुम्हाला अधिकार दिल्याचं शरद पवारांनी सांगितलं.

स्वाती मालिवाल भाजपच्या षडयंत्राचा भाग; आपकडून घणाघाती आरोप

नवी दिल्ली । वृत्तसेवा

दिल्लीच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वाती मालिवाल यांनी आपल्याला मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी बेदम

मारहाण केल्याचा आरोप केला होता. मुख्यमंत्र्यांचे पीए विभव कुमार यांच्याकडून मारहाण झाल्याचे आरोप त्यांनी केले होते. पण आता त्यांच्यावर आपकडून पलटवार करण्यात आला आहे. स्वाती मालिवाल या भाजपच्या षडयंत्राचा एक भाग आहेत, असा घणाघाती आरोप आपकडून करण्यात आला आहे.

आपच्या प्रवक्त्या आतिषी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत घेऊन मालिवाल यांच्यावर घणाघाती आरोप केले. त्यांनी म्हटले की, ''जेव्हापासून अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळाला आहे. तेव्हापासून भाजपचा तिळपापड झाला आहे. तेव्हापासून भाजपने एक षडयंत्र रचले, त्या षडयंत्राचा एक भाग म्हणून स्वाती मालिवाल यांना १३ मे रोजी सकाळी सकाळी अरविंद केजरीवाल यांच्या घरी पाठवण्यात आले. स्वाती मालिवाल या षडयंत्राचा चेहरा आणि मोहराही होत्या. मालिवाल या अपॉईंटमेंटशिवाय मुख्यमंत्र्यांच्या घरी पोहोचल्या, त्यांचा इरादा होता की, मुख्यमंत्र्यांवर आरोप लावावेत. पण मुख्यमंत्री त्यावेळी घरी उपस्थित नव्हते त्यामुळे ते वाचले.

भाजप बहुमताचा आकडा पार करणार नाही –पृथ्वीराज चव्हाण

मुंबई । प्रतिनिधी

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजप २२० ते २५० जागा जिंकेल, एनडीएला २७२ हा बहुमताचा आकडाही पार करता येणार नाही, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. २०१९ मध्ये बहुतांश राज्यांमध्ये भाजपचा परफॉर्मन्स इतका चांगला होता की, आता त्यांना वर जायला जागाच शिल्लक नाही. गुजरात, राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये भाजपला वर जायला आता जागाच नाही, त्यामुळे याठिकाणी झाल्या तर भाजपच्या जागा कमीच होतील. याचा फटका भाजपला बसेल, असे ते म्हणाले.

मुंबईत प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. चव्हाण म्हणाले, माझ्या मते देशातील सहा राज्ये महत्त्वाची आहेत, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा, या सहाही राज्यात भाजपच्या जागा कमी होतील. परिणामी

भाजपप्रणित एनडीए २७२ ही मॅजिक फिगर गाठू शकणार नाही, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अदानी–अंबानी यांच्याबाबत केलेले वक्तव्य म्हणजे सेल्फ गोल होता. ही भ्रमित व्यक्तीची लक्षणे आहेत. आपण जिंकत नाही, सत्ता निसटत चालली आहे, याची जाणीव झाल्यामुळे पंतप्रधान मोदी हे व्यथित झाले आहेत. भाजपला यंदाच्या निवडणुकीत फारतर २५० जागांवर विजय मिळेल, असे वक्तव्य काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. निवडणुकीत हार–जीत होत असते. पंतप्रधान मोदी यांनी पराभव स्वीकारला पाहिजे, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले. यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडून उपस्थित करण्यात येत असलेल्या हिंदू–मुस्लीमांच्या मुद्यावर भाष्य केले. नरेंद्र मोदींना महाराष्ट्राचा इतिहास माहिती नसेल. महाराष्ट्राची जनता ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्वांवर चालते. शिवाजी महाराज हे सर्वधर्मसमभावाचे सर्वात मोठे प्रतीक आहेत, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले.पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान मोदी यांनी घाटकोपरमध्ये काढलेल्या रोड शो वर टीका केली. घाटकोपरच्या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला. तिकडेच पंतप्रधान मोदींनी रोड शो केला. मोदींमध्ये संवेदना असती तर त्यांनी रोड शोचा रस्ता बदलला असता किंवा तो रद्द केला असता. अथवा त्यांनी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांची भेट घ्यायला पाहिजे होती, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले.

अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार मुंबईत महायुतीच्या व्यासपीठावर प्रकटले

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अखेरच्या टप्प्यामध्ये महायुती आणि इंडिया आघाडीकडून महाराष्ट्रामध्ये जोरदार ताकद लावण्यात आली आहे. आज (१७ मे) महाराष्ट्रामध्ये प्रचाराची सांगता होत असल्याने मुंबईमध्ये एक प्रकारे दोन्ही आघाड्यांकडून जोरदार शक्तीप्रदर्शन होत आहे. मनसेनं आयोजित केलेल्या महायुतीच्या प्रचाराची सांगता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईमध्ये आहेत, तर इंडिया आघाडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, आपचे खासदार संजय सिंह आदी नेते मुंबईमध्ये पोहोचले आहेत. उद्धव ठाकरे सुद्धा थोड्याच वेळात सभेला पोहोचतील. दोन्ही सभांमधून नेते कोणत्या फैरी झाडणार? याकडे सुद्धा लक्ष असेल.

गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये

उपमुख्यमंत्री अजित पवार नाराज असल्याचे चर्चा होती. ११ मे रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेनंतर अजित पवार हे जाहीर कार्यक्रमांमध्ये किंवा सभांमध्ये दिसून आले नव्हते. त्यामुळे पुन्हा एकदा अजित पवार गायब झाल्याची चर्चा माध्यमांमध्ये रंगली होती. मात्र, आज (१७ मे) होत असलेल्या सभा प्रचार सांगता सभेमध्ये अजित पवार व्यासपीठावर प्रकटले आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गायब असल्याची चर्चा होती, त्याला आता पूर्णविराम मिळाला आहे.

अजितदादांच्या आमदारांची संख्या एकने घटली

पोटनिवडणूक होणार नाही, जागा रिक्त राहणार

अहमदनगर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षात प्रवेश करण्यासाठी नीलेश लंके यांनी पारनेरच्या आमदारपदाचा राजीनामा दिला होता. विधानसभा अध्यक्षांनी तो मंजूर केला आहे. त्यामुळे पारनेरची आमदारकीची जागा आता रिक्त झाल्याची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे अजितदादा गटाच्या आमदारांची संख्या आता एकने घटली आहे. एवढ्यात पोट निवडणूक होण्याची शक्यता नसल्याने विधानसभेची निवडणूक होऊपर्यंत ही जागा रिक्त राहणार आहे. विधानसभेला आता पारनेरमधील राजकीय समीकरण कसे असेल, याचीही चर्चा सुरू झाली आहे.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून लंके यांनी महाविकास आघाडीकडून

निवडणूक लढविली. त्यांच्या उमेदवारीच्यावेळी मोठे नाट्य घडले होते. आमदारकीचा राजीनामा न देता पक्षांतर केल्यास त्यांना अपात्र ठरविले जाण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांनी या पदाचा १० एप्रिलला राजीनामा दिला आणि पवार गटातून उमेदवारी मिळविली. अर्थात हे सर्व सहा महिन्यांपूर्वीच ठरल्याचा गौप्यस्फोट प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अलीकडेच केले होता. विधानसभा अध्यक्षांनी १० एप्रिललाच लंके यांचा राजीनामा स्वीकारला आहे. यासंबंधीची २४ एप्रिलची अधिसूचना नुकतीच प्रकाशित झाली आहे. त्यामध्ये पारनेरची जागा आता रिक्त झाल्याचे म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस फुटीच्यावेळी लंके यांनी एकदा अजितदादा यांच्या बाजूने तर नंतर पवार यांच्या बाजूने जाण्याची भूमिका घेतली होती. शेवटी अजितदादा यांच्यासोबत जाण्याचा अंतिम निर्णय त्यांनी घेतला. मात्र, त्यांना नगरचे खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विरोधात लोकसभेची निवडणूक लढविण्याची इर्षा होती. मात्र, अजितदादा गटाकडून उमेदवारी मिळू शकत नसल्याने त्यांना पवार गटात प्रवेश करावा लागला. त्यासाठी त्यांनी राजीनामा दिला. तो मंजूर झाला आहे. त्यामुळे त्यांना आता नियमाप्रमाणे आमदारांना मिळणारे निवृत्तीवेतन मिळणार नाही. शिवाय ही जागा रिक्त झाल्याने नवी राजकीय समीकरणे जुळविण्यास सुरवात झाली आहे. पारनेरला आता आमदार नसला तरी पालकमंत्री या नात्याने राधाकृष्ण विखे पाटील येथे लक्ष घालतील, असे अजितदादा पारनेर येथील प्रचार सभेत म्हणाले होते. लोकसभा निवडणुकीत झालेले टोकाचे राजकारण लक्षात घेता विखे पाटील पारनेर तालुक्यात अधिक लक्ष घालण्याची शक्यता आहेच. त्यातून आता तेथे विधानसभेसाठी नवी समीकरणे जुळविली जाण्याचीही शक्यता आहे. अर्थात ४ जूनला लोकसभेचा निकाल काय लागतो, यावर बरीच गणिते अवलंबून आहेत.

ईव्हीएम स्ट्राँग रूमवर लंके यांचाही वॉच

बारामती लोकसभा मतदारसंघात ईव्हीएम ठेवण्यात आलेल्या स्ट्राँग रूमच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित झाला होता. या पार्श्वभूमीवर अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी येथील ईव्हीएम स्ट्राँग रूमवर २४ तास निगराणी ठेवणारी यंत्रणा उभारली आहे. यंत्रे ठेवलेल्या गोदामाच्या बाहेर तंबू ठोकून तेथे कार्यकर्ते तैनात करण्यात आले आहेत. प्रशासनाने त्यांच्यासाठी सीसीटीव्हीची दृष्य दाखविणारे स्क्रीनही उपलब्ध करून दिले आहेत. मतदानानंतर एमआयडीसीमधील गोदामात मतदान यंत्र ठेवण्यात आली आहेत. नियम आणि पद्धतीनुसार त्याला त्रीस्तरीय सुरक्षा देण्यात आली असून नियमानुसार सुरक्षेचे सर्व उपाय प्रशासनाने केले आहेत. तरीही बारामती येथील प्रकारानंतर सावध भूमिका घेत लंके यांनी तेथे स्वत:ची यंत्रणाही उभी केली आहे. लंके यांचे समर्थक स्ट्राँग रूमबाहेर तंबू ठोकून बसले आहेत. ते तेथे चोवीस तास पहारा देत आहेत. प्रशासनाने तेथे सीसीटीव्ही स्क्रीन उपलब्ध करून दिले आहे.

शरद पवार धर्मनिरपेक्ष नाहीत; प्रकाश आंबेडकर यांचा धक्कादायक दावा

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचा राज्यातील पाचवा आणि अखेरचा टप्पा जवळ आला आहे. येत्या २० मे रोजी पाचव्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी महासभा आणि रोड शो करण्यावर भर दिला आहे. ही रणधुमाळी अत्यंत शिगेला पोहोचलेली असतानाच वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एक मोठा दावा केला आहे. आंबेडकर यांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्याबाबतचा हा दावा केला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

प्रकाश आंबेडकर हे टीव्ही९ मराठीशी संवाद साधत होते. त्यावेळी त्यांनी शरद पवार यांच्याबाबतचा दावा केला आहे. शरद पवार हे धर्मनिरपेक्ष असल्याचं खोटं सांगत आहेत. शरद पवार सेक्युलर नाही. मी त्यांना सेक्युलर मानत नाही. ते संधीसाधू आहेत, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. तर उद्धव ठाकरे हे धर्मवादी आहेत हे उघड आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसलेंना जामीन मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

येस बँक आणि दिवाण हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या (डीएचएफएल) संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अटकेत असलेल्या पुण्यातील बिल्डर-हॉटेल व्यावसायिक अविनाश भोसले यांना हायकोर्टाने आज (दि.१७) दिलासा दिला. न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांनी १ लाखाचा सशर्त जामीन मंजूर केला आहे.

अविनाश भोसले यांना अटक का केली होती?

येस बँक आणि दिवाण हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या (डीएचएफएल) संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरण

आरकेडब्ल्यू डेव्हलपर्सला वांद्रे येथील प्रकल्पासाठी ७५० कोटींचे कर्ज मंजूर केल्याचा आरोप

वरळी येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातही सल्ला शुल्क रक्कम मिळाली.

सीबीआयने अविनाश भोसलेंना अटक करण्यात आली होती.

वांद्रे येथील प्रकल्पासाठी ७५० कोटींचे आणखी कर्ज मंजूर केल्याचा त्यांच्यावर आरोप

डीएचएफएलची समूह कंपनी असलेल्या आरकेडब्ल्यू डेव्हलपर्सला वांद्रे येथील प्रकल्पासाठी ७५० कोटींचे आणखी कर्ज मंजूर केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. तसेच भोसलेंना वरळी येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातही सल्ला शुल्क रक्कम मिळाली. प्रकल्पाचा खर्च, वास्तुविशारद आणि अभियांत्रिकी आराखडा करार, वित्तीय मूल्यांकन व संरचना आदींबाबत भोसलेंच्या कंपन्यांकडून सल्ला देण्यात आल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

या प्रकरणी सीबीआयने अविनाश भोसलेंना अटक करण्यात आली होती. सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर भोसले यांनी उच्च न्यायालयात जामीनसाठी अर्ज केला होता. त्या अर्जावर न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या समोर सुनावणी झाल्यानंतर ४ एप्रिलरोजी राखून ठेवलेला निर्णय आज देण्यात आला.

नऊ वर्षांनंतर चाकण टप्पा पाचचे भूसंपादन पूर्ण होणार

शिवनेरी । प्रतिनिधी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चाकण टप्पा क्रमांक पाचसाठी खेड तालुक्यातील सहा गावांतील ६९३.९४ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात येणार असून, आतापर्यंत ५० टक्क्यांपेक्षा अधिक म्हणजे ३९८.८६ हेक्टर क्षेत्र एमआयडीसीच्या ताब्यात आले आहे. अद्यापही २९५ हेक्टर क्षेत्र ताब्यात आले नसून, हे क्षेत्र आता सक्तीने संपादित करण्यात येणार आहे. यासाठीची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. यामुळे अखेर नऊ वर्षांनंतर चाकण टप्पा पाचचे भूसंपादन पूर्ण होणार आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या जमिनीवर सन २००४ पासूनच चाकण आंतरराष्ट्रीय विमानतळाचे शिक्के पडले होते.

जिल्ह्यातील चाकण, रांजणगाव, तळेगाव या औद्योगिक क्षेत्रात जमीन मिळावी यासाठी देशासह परदेशातील उद्योजकांची सर्वाधिक मागणी असते. त्यातही चाकण एमआयडीसीला उद्योजकांची सर्वाधिक पसंती असते. यामुळेच चाकण एमआयडीसीत एक नाही, दोन नाही तर तब्बल पाच टप्प्यात भूसंपादन करण्यात आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चाकण टप्पा क्रमांक पाचसाठी खेड तालुक्यातील आंबेठाण, रोहकल, गोनवडी, बिरदवडी, चाकण आणि वाकी खुर्द या सहा गावांतील ६९३.९४ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे. शेतक-यांच्या संमतीने आतापर्यंत २९६.६६ हेक्टर संपादित करण्यात आले आहे. परंतु आता शिल्लक क्षेत्रासाठी सक्तीने संपादित करण्यात येणार आहे. सक्तीने भूसंपादन करताना शेतकऱ्यांना शेतीसोबतच घरे, गुरांचे गोठे, फळझाडे यासाठी अधिकचे पैसे देण्यात येणार असल्याची माहिती खेडचे प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी दिली. या सक्तीच्या भूसंपादनामुळे गेले नऊ वर्षांपासून रखडलेले चाकण टप्पा पाचचे भूसंपादन पूर्ण होणार आहे.

चाकण टप्पा पाचसाठी गेले अनेक वर्षांपासून भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. यासाठी शेतकर्यांच्या वारंवार बैठका घेऊन त्यांना कसा फायदा होईल याची माहिती देण्यात आली. यामुळेच आता ५० टक्यांपेक्षा अधिक भूसंपादन झाले, परंतु आता सक्तीने भूसंपादन करण्यात येणार आहे.

पुणे-सातारा महामार्गावर शेकडो होर्डिंग स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी

नसरापूर । प्रतिनिधी

घाटकोपरमध्ये अनधिकृत होर्डिंग पडून १६ जणांचा मृत्यू झाल्यानंतर अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुणे-सातारा महामार्गावरील होर्डिंगकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, टोल प्रशासन व पीएमआरडीए एकमेकांकडे बोट दाखवून दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अनधिकृत व धोकादायक होर्डिंग अजूनही तशीच आहेत. सातारा महामार्गावरील खेडशिवापूर टोलनाका ते सारोळापर्यंत सातारा बाजूला जवळपास ५५ होर्डिंग तसेच सारोळा ते टोलनाकापर्यंत पुणे बाजूला जवळपास ४३ होर्डिंग सेवारस्त्याला तसेच खासगी जागेवर आहेत.

जाहिरात फलक नियंत्रण अधिनियमानुसार रस्त्यांवर वाहनचालकांचे लक्ष विचलित होईल, तसेच ४० बाय २० फुटांपेक्षा जास्त आकाराचे होर्डिंग उभारता येत नाहीत. परंतु, नियमांकडे दुर्लक्ष करत होर्डिंग उभारण्यात आली आहेत. दोन वर्षापूर्वी आलेल्या वादळात महामार्ग रस्त्यांवर असलेल्या होर्डिंगचे पत्रे उडाले होते. तर काही होर्डिंग पडले होते. त्यानंतर प्रशासनाने महामार्गावरील भल्यामोठ्या होर्डिंगकडे दुर्लक्षच केल्याचे दिसते. महामार्गावरील अनेक होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नाही. संबंधित अधिकारी आणि होर्डिंग ठेकेदार यांच्या संगनमताने महामार्गावर अवाढव्य होर्डिंग उभारण्यात आल्याचा आरोप होत आहे.

> सारोळा गावचे हद्दीमध्ये होर्डिंगबाबत ग्रामपंचायतीकडून एनओसी दाखला देण्यात आलेला नाही. येत्या दोन दिवसात बेकायदेशीर होर्डिंगवर कारवाई करण्यात येईल.
>
> – रूपाली साईनाथ धाडवे, सरपंच सारोळा
>
> होर्डिंगसाठी ग्रामपंचायतीने परवानगी दिलेली नाही. लवकरच ग्रामपंचायतीची बैठक घेऊन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.
>
> – नवनाथ कदम, सरपंच
>
> पुण्यातील घटनेच्या पार्श्वभूमीवर आम्ही संबंधित विभागाला होर्डिंगवर कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यांना पुन्हा स्मरणपत्र बजावणार आहे.
>
> – सचिन पाटील, तहसीलदार, भोर

अधिकारी, ग्रामपंचायतीवर गुन्हा दाखल करा

सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चर ऑडिट करणे गरजेचे आहे. महामार्गावर असलेल्या होर्डिंगला परवानगी देणार्या अधिकार्यांवर आणि ग्रामपंचायतीवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे. याबाबत एनएचआयचे प्रकल्प संचालक संजय कदम यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही. तर येत्या काही दिवसांमध्ये मोजणी करून होर्डिंग हटवले जाणार असल्याचे रिलायन्सच्या एका अधिकार्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले.

राजगुरुनगर हादरलं! मुलींना इंजेक्शन देऊन, दारू पाजून केला बलात्कार; गुन्हा दाखल

राजगुरुनगर । प्रतिनिधी

हवस भागवण्यासाठी तीन युवकांनी ओळखीच्या असलेल्या दोन अल्पवयीन मुलींना विश्वासात घेऊन ड्रगचे इंजेक्शन दिले. तसेच लॉजवर नेऊन बिअर आणि दारू प्यायला देऊन सलग रात्रभर त्या अल्पवयीन मुलींचे अक्षरशः लचके तोडल्याचा भयानक आणि किळसवाणा प्रकार खेड तालुक्यात घडला असल्याचे समोर आले आहे. तिघा आरोपींविरोधात खेड पोलीसांनी पॉस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.दोघेजण ताब्यात घेतले असून मुख्य सुत्रधार फरार आहे.

यातील एक युवक अल्पवयीन आहे. फरार असलेला प्रमुख आरोपी हा ड्रग पुरवणारा सुत्रधार असुन त्याच्याकडून आत्तापर्यंत किती जणांना ड्रग पुरवले? याबाबतीत पोलिस माहिती घेत आहेत. दरम्यान, मंगळवारी (दि १४) रात्री हा प्रकार घडला. बुधवारी सकाळी नशेत झिंगून घरी परत आल्यावर मुलींच्या पालकांच्या लक्षात ही बाब आली अन प्रकरणाचे गांभीर्य ओळखून त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली.राजगुरुनगर शहर परिसरात वास्तव्य असलेली आणि महाविद्यालयात शिकत असलेली ही मुले,मुली आहेत. त्यांच्या या प्रकाराची माहिती बाहेर आल्यानंतर अशा वयातील मुलांच्या पालकांमध्ये चिंता आणि भितीचे वातावरण पसरले आहे.

गुन्हा दाखल

गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही महत्त्वाचा तपास सुरू आहे. सर्व प्रकारा बाबत सायंकाळी सहा वाजता पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात येईल. असे पोलिस निरिक्षक राजकुमार केंद्रे यांनी सांगितले.

गोळीबार प्रकरण : निवृत्त मेजरच्या विरोधात शेतकरी संघटना आक्रमक

भोर :: पसुरे- कर्नवडी (ता. भोर) येथील शेतकर्यांना धमकाविण्यासाठी हवेत गोळीबार करून दहशत माजविणार्या निवृत्त मेजरच्या विरोधात शेतकरी संघटना तसेच स्थानिक शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पसुरेतील स्थानिक शेतकर्यांच्या शेतजमिनीवर अतिक्रमण करून निवृत्त मेजर हितेशपाल सिंग याने विजेचे खांब उभे केले होते. याबाबत बुधवारी (दि. १५) बिर्हामणेवाडीतील अशोक गेणबा बिर्हामणे, प्रकाश तुकाराम शेलार, शंकर दिनकर बिर्हामणे, सोनबा कोंडिबा बिर्हामणे, चंद्रकांत कुरुंगावडे व कर्नवडीतील पवार हे शेतकरी जाब विचारण्यासाठी गेले होते. या वेळी शेतकर्यांना धमकाविण्यासाठी कर्नल सिंग यांनी हवेत दोन फैरी झाडल्या होत्या. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक शेतकर्यांनी या घटनेनंतर मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दहशत माजवणार्या फार्म हाऊस (कुंजवन) मालकावर व त्यांच्या सोबत असणार्या इतर दोन ते तीन साथीदारांवर कारवाई व्हावी, महसूल विभागाशी संपर्क करून ज्या बेकायदेशीर जागेवर ताबा केला आहे त्या सर्व जागांची चौकशी करावी, तसेच त्यांचे दोन वर्षाचे फोन रेकॉर्डिंग तपासून त्यांच्यावर योग्य कारवाई व्हावी. हे निवेदन भोर पोलिसांनादेखील देण्यात आले आहे.

दरम्यान, याबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे युवा शेतकरी संघ व नागरिक शेतकरी संघाने इशारा दिला. या वेळी नागरिक शेतकरी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे, युवा शेतकरी संघाचे अध्यक्ष रोहिदास चोरघे, सरपंच प्रवीण धुमाळ, मानसिंग धुमाळ, विजय धुमाळ, उमेश देशमुख, विनोद गायकवाड, बाळासो चोरघे व ग्रामस्थ उपस्थित होते.

आचारसंहिता असताना तुम्ही बेकायदेशीर जमाव केला असून, तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा दम या घटनेनंतर भोर पोलिसांनी पसुरे-कर्नवडी ग्रामस्थांना फोनवरून दिला.

सात बिबटे पकडण्यात वन विभागाला यश; वनपरिक्षेत्र अधिकारी वैभव काकडे यांची माहिती

नारायणगाव / ओतूर । प्रतिनिधी

काळवाडी (ता. जुन्नर) हद्दीत वन विभागाने लावलेल्या पिंजर्यात सातवा बिबट्या पकडण्यात यश आले आहे. बुधवारी (दि. १५) रात्री ९ च्या सुमारास हा बिबट्या पिंजर्यात अडकला. त्यास माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात ठेवण्यात आला आहे. गेल्या १० दिवसांत एकूण ७ बिबटे पकडण्यात आले असून, त्यामध्ये हल्ला करणार्या बिबट्यांचा समावेश असल्याची शक्यता आहे, अशी माहिती वन क्षेत्रपाल वैभव काकडे यांनी दिली.

काळवाडी येथे दि. ८ मे रोजी रुद्र फापाळे या ८ वर्षांच्या बालकाला बिबट्याने हल्ला करून ठार केले होते. त्या वेळी वन विभागाने तत्काळ परिसरात पिंजरे व ट्रॅप कॅमेरे लावले आहेत. तसेच वरिष्ठ अधिकार्यांसह पथके कार्यरत आहेत. वन विभागाने गेल्या १० दिवसांपासून परिसरात लावलेल्या पिंजर्यात हा सातवा बिबट्या अडकला आहे. परिसरात कोणाला बिबट्या आढळला तर वन कर्मचार्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

अफवांवर विश्वास ठेवू नका

येडगाव येथील सह्याद्री पुलावर वन विभागाने ३ बिबट सोडल्याची अफवा पसरली. एका स्थानिक यूट्यूब चॅनेलने त्याला प्रसिध्दी दिली. यामुळे काळवाडी व पिंपरी पेंढार येथे सोडलेल्या बिबट्यानेच हल्ले केले असा गैरसमज निर्माण झाला. यामुळे वन विभागाबाबत नागरिकांमध्ये संताप दिसून आला. यामुळे वन कर्मचारी यांना शासकीय कामात अडथळा करून मारहाणदेखील करण्यात आली. यामध्ये एक महिला वनरक्षक जखमी झाली आहे. नागरिकांनी चुकीच्या बातम्या व अफवांवर विश्वास ठेवू नये. नागरिकांनीदेखील अफवा पसरवू नये. वन विभाग बिबट समस्या सोडविण्यास नक्कीच प्रयत्नशील आहे. वन विभागाने दिवसरात्र काम करून बिबटे जेरबंद करून परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

बेकायदा होर्डिंग; अपघातांना निमंत्रण : चाकण परिसरातील चित्र

चाकण । प्रतिनिधी

मागील वर्षी महाकाय होर्डिंग चाकण वाहतूक विभागाच्या पोलिस चौकीवर कोसळल्याची धक्कादायक घटना पुणे-नाशिक महामार्गावरील स्पायसर चौक भागात घडली होती. असेच धोकादायक होर्डिंग पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग आणि तळेगाव-चाकण ते शिक्रापूरदरम्यानच्या अनेक ठिकाणी आजही उभे आहेत. वादळी वारे आणि मुसळधार पावसात यामुळे धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा घटनेची पुनरावृत्ती चाकणमधील राष्ट्रीय महामार्गावर कधीही होऊ शकेल अशी परिस्थिती आहे.

काही दिवसांपूर्वी वादळी पावसाने चाकणमध्ये होर्डिंगमुळे ४६ हजार ग्राहकांची वीज खंडित झाल्याची बाब समोर आली होती. वीजवाहक तारांवर खांब पडल्याने या भागातील सुमारे ४६ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा विस्कळीत झाल्याची आकडेवारी महावितरणकडून देण्यात आली होती. मात्र, अशा बेकायदा होर्डिंग उभारणार्या मंडळींवर एकदाही कारवाई झालेली नाही. त्यामुळे त्यांचे चांगलेच फावले असून, दिवसागणिक अशा बेकायदा होर्डिंगमध्ये वाढ होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

पुणे-नाशिक व तळेगाव-चाकण ते शिक्रापूरदरम्यानच्या महामार्गालगत असलेले बहुतांश होर्डिंग बेकायदा आहेत. यातील अनेक होर्डिंगला बंधनकारक असलेले स्थैर्य प्रमाणपत्र म्हणजे स्टॅबिलिटी सर्टिफिकेट नसल्याची वस्तुस्थिती वारंवार समोर येत आहे. त्यामुळे ही होर्डिंग एकीकडे शहराचे विद्रुपीकरण आणि दुसरीकडे नागरिकांच्या जीविताला थेट धोकादायक ठरणारी आहेत.

ऊन तसेच पावसात गंजून कमकुवत झालेले होर्डिंग कोसळण्याचा धोका या भागात निर्माण झाला आहे. कोट्यवधी रुपयांची कमाई होत असल्याने आणि बड्या राजकीय मंडळींचा पाठिंबा मिळत असल्याने साक्षात मृत्यूचे सापळा असलेले हे होर्डिंग उभे असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. अनेकदा तक्रारी होऊनही याबाबत ठोस कारवाई होत नसल्याची स्थिती वारंवार समोर येत आहे.

त्यांचे बेकायदा होर्डिंगला पाठबळ

चाकण शहर आणि पंचक्रोशीतील विविध भागांत तसेच वाड्यावस्त्यांवर फलकबाजी केली जात आहे. यात खून, खुनाचे प्रयत्न असे अत्यंत गंभीर गुन्हे, शिक्षा झालेल्या आणि तडीपारीच्या कारवाईला साजसे कर्तृत्व असलेल्या आणि चाकण एमआयडीसीमध्ये वेगवेगळी चुकीची कामे करणार्या कुख्यात गुन्हेगारांचे उद्दात्तीकरण होत असल्याचे दिसून आले आहे. कुख्यात गुन्हेगारांना शुभेच्छांचे फलक लावून दहशत माजवली जात आहे. चौकाचौकांत असे फलक उभारून चौक विद्रूप केले जात आहेत. राजकीय नेत्यांचे वाढदिवस, राजकीय कार्यक्रम, पूजा, क्रिकेटचे सामने, जाहिरातींपासून निधन- दशक्रिया यांच्यासह विविध सणांच्या शुभेच्छांचे फलक लावण्यात येत आहेत. यात भर म्हणून आता लग्न व साखपुड्यानिमित्तही भावी वधू-वरांचे फोटो असलेले भले मोठे फ्लेक्स लावण्यात येऊ लागले आहेत. प्रशासन याकडे सपशेल दुर्लक्ष करत आहे.

कारवाईची मागणी

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या बेकायदा अजस्र लोखंडी सांगाडे असलेल्या फ्लेक्स, होर्डिंग, एलइडी स्क्रीनमुळे वाहनचालक आणि पादचार्यांची डोकेदुखी वाढली आहे. कोणतेही तारतम्य न बाळगता लावलेले हे शेकडो फलक अपघातांना कारणीभूत ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या पद्धतीने अनधिकृत होर्डिंगचे सांगडे उभारणार्या मंडळींवर कठोर कारवाई करण्याची मागणी चाकण पंचक्रोशीतील नागरिकांतून होत आहे.